cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१०२ | बुधवार, दि.६ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### प्रज्वलच्या रूपाने टोंनग्यांना चपराक !

जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाचा माजी खासदार प्रज्वल रेवण्णा याला बंगळुरूमधील विशेष न्यायालयाने बलात्कार प्रकरणात शनिवारी मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. प्रज्वल माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा नातू, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांचा पुतण्या असून त्याला पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. बंगळुरूमधील विशेष खासदार, आमदार न्यायालयाचे न्यायाधीश संतोष भट यांनी ३४ वर्षीय प्रज्वलला जन्मठेप आणि ११.५० लाखांचा दंडही ठोठावला. दंडाच्या रकमेतील ११.२५ लाख रुपये पीडित महिलेला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

### यंदा आनंदाचा शिधा मिळणार नाही-भुजबळ

मुंबई-मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून सरकारच्या तिजोरीवर मोठा भार पडला असून, याचा परिणाम अनेक योजनांवर झाला आहे. काही योजना बंद करण्याची नामुष्की सरकारवर आली आहे. लाडकी बहीण योजनेमुळे यंदा दिवाळीला आनंदाचा शिधा मिळणार नाही. सरकारच्या तिजोरीवर ताण पडत असल्याने यंदा आनंदाचा शिधा लाभार्थ्यांना मिळणार नसल्याची माहिती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. मुख्यमंत्री लाडकी बहीण या लोकप्रिय योजनेवर वर्षाला सरकारच्या तिजोरीवर ४५ हजार कोटी रुपयांचा भार पडत आहे. त्यामुळे इतर योजनांवर काही प्रमाणात परिणाम होत आहे. आनंदाचा शिधा या योजनेसाठी वर्षाला ३५० कोटी रुपये लागतात. सध्या तिजोरीवर ताण असल्याने यंदा आनंदाचा शिधा मिळणार नाही. आगामी काळात आर्थिक परिस्थिती सुधारल्यास आनंदाचा शिधा पुन्हा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाईल असे मंत्री छगन भुजबळ म्हणाले.

## थोडक्यात...

### सराफा बाजारात सोन्याची भरारी

पुणे- सराफ बाजारात सोन्याने चांदीच्या दरात पुन्हा मोठी वाढ झाली आहे. जळगावच्या सराफ बाजारात सोन्याच्या दरात १,७०० रुपयांनी वाढ झाली असून सोने पुन्हा एक लाख पार गेले आहे. सोन्याच्या भावात वाढ होऊन सोन्याचे दर १ लाख २०० रुपयांवर पोहोचले. चांदीच्याही भावात १ हजार रुपयांची वाढ होऊन चांदीचे दर १ लाख १३ हजार रुपयांवर पोहोचले आहे.

### निशिकांत दुबे यांच्या विरोधात याचिका दाखल

मुंबई-भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे. मनसे नेते सुदाम कोंबडे यांनी मानहानीची याचिका दाखल केली. नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात याचिका दाखल केली. १५ दिवसांपूर्वी त्यांना नोटीस दिली होती. मराठी माणसाची माफी मागावी अन्यथा याचिका दाखल करण्याचा इशारा दिला होता.

### खा. शाहु महाराज नाराज

कोल्हापुर- मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीला न बोलावल्याने खासदार शाहु महाराज नाराज झाल्याचे समजते. त्यांना या बैठकीला बोलावले नसल्याचे समोर येत आहे.

### कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पदभार स्विकारला

मुंबई-मी शेतकरी पुत्र आहे, त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी मला माहीत आहेत, असे प्रतिपादन कृषीमंत्री दत्तात्रय भरणेंनी केले असून मंगळवारी त्यांनी कृषीमंत्री पदाचा पदभार स्विकारला आहे.

### लाडकी बहीणच्या पुरुष लाभार्थ्यांना नोटिसा

मुंबई : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही गरीब व गरजू महिलांसाठी असतानाही १४ हजारांपेक्षा जास्त पुरुषांनीही त्या योजनेचे पैसे लाटल्याचे नुकतेच उघड झाले होते. या पुरुषांकडून आता ते पैसे वसूल केले जाणार आहेत. त्यासाठी त्यांना सरकारकडून नोटीस बजावण्यात आली असून एका महिन्यात पैसे परत न केल्यास फौजदारी कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. लाडक्या भावांनी आतापर्यंत २१ कोटी ४४ लाख रुपये लाटल्याची माहिती आहे.

### पेट्रोल-डिझेल स्वस्त होण्याची शक्यता

नवी दिल्ली: ओपेक देशांनी कच्च्या तेलाचे उत्पादन दररोज तब्बल ५.४७ लाख बॅरलने वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाची उपलब्धता वाढून पेट्रोल, डिझेलसह पेट्रोलियम उत्पादनांच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे. रशिया, सौदी अरेबियासह प्रमुख उत्पादक देशांनी सप्टेंबरपासून उत्पादन वाढवण्याचा निर्णय घेतल्याने भारतासारख्या आयातदार देशांना मोठा फायदा होऊ शकतो. पेट्रोल-डिझेलच्या किमतींमध्ये लवकरच दिलासा मिळू शकतो, अशी अपेक्षा वर्तवली जात आहे.

# पीएम किसानचे पैसे रोखले; या शेतकऱ्यांना फटका

## सरकारकडून जाहीर; या तीन कारणांमुळे २००० रुपये थांबवले

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**पंतप्रधान किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याचे २००० रुपये २ ऑगस्टला जारी करण्यात आले. मात्र काही शेतकऱ्यांची रक्कम थांबवण्यात आली आहे. तीन कारणांमुळे हे पैसे थांबवल्याचे समोर आले आहे.**




पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याची रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील कार्यक्रमातून शेतकऱ्यांच्या खात्यात पीएम किसान सन्मान निधीची रक्कम पाठवण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला होता. २ ऑगस्ट रोजी ९.७० कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात २०५०० कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत. मात्र, काही शेतकऱ्यांच्या खात्यात पीएस किसान सन्मान निधीचे पैसे आलेले नाहीत. पीएम किसान सन्मान निधीच्या पोर्टलवरुन याबाबत माहिती देण्यात आली आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून पीएम किसान सन्मान निधी योजना चालवली जाते. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या वेबसाईटवर पान २ वर

### “ ही आहेत तीन कारणे

पीएम किसान सन्मान निधी योजनेतील ज्या लाभार्थ्यांनी १ फेब्रुवारी २०१९ नंतर शेतजमीन खरेदी केली असेल, ते या योजनेस पात्र नसतील. याशिवाय एकाच कुटुंबातील एक पेक्षा अधिक लाभार्थी लाभ घेत असतील तर त्यांची चौकशी केली जाईल. उदा. पती पत्नी, वयस्कर व्यक्ती किंवा लहान मुलं यांनी लाभ घेणे. तसेच आधार कार्ड, बँक खाते किंवा जमीन रेकॉर्ड यामध्ये फरक असल्याचे दिसून आल्याने देखील पीएम किसानचा लाभ थांबवला जाऊ शकतो. पीएम किसानच्या नोंदणीकृत शेतकऱ्यांना ई केवायसी करावी लागेल.

# एकदा पराभूत झालो म्हणून राजकारण सोडणार नाही जिल्हा परिषद पूर्ण ताकतीनिशी लढणार

## अभिष्टचिंतन सोहळ्यात माजी आ भीमराव धोंडे यांची घोषणा; बैठकीला सभेचे स्वरूप

**आष्टी प्रतिनिधी**

**शेतीचे पीक वाया गेलं तर शेतकरी शेती सोडतो का आम्ही एकदा पराभव झाला म्हणून राजकारण सोडणार नाही माजी आमदार भीमराव धोंडे कार्यकर्ता बैठकीमध्ये बोलत होते आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका आपण ताकतीनिशी लढवणार असल्याचा दृढ विश्वास माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आज झालेल्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केला.**






पुढे बोलताना ते म्हणाले की आपला निर्णय थोड्या दीवसात जाहीर करु मागे झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारीच्या तिकिटासाठी आम्ही प्रबळ दावेदार होतो मात्र ऐनवेळी आम्हाला भाजपने डावल्याने कार्यकर्ते नाराज झाली व अपक्ष निवडणूक लढा अशी त्यांनी मागणी केली आम्ही अपक्ष लढलो ताकतीनिशी लढलो मात्र आमचा पराभव झाला पराभव कशाने झाला ईव्हीएम घोटाळा झाला तसेच आम्हाला मोठा फटका पान २ वर

## वकील संघाच्या निवडणुकीत १७ उमेदवार रिंगणात

**बीड । प्रतिनिधी**

**११ ऑगस्टला होणाऱ्या बीड जिल्हा वकील संघाची निवडणूक राहणार असल्याचे चिन्ह दिसत आहे अध्यक्ष उपाध्यक्षग्रंथपाल सचिव या पदासाठी तिरंगी लढत होत असून सचिव सहसचिव व कोष व अध्यक्ष व महिला पदासाठी दुरंगी लढत होत आहे. या निवडणुकीसाठी १७ उमेदवार रिंगणात असल्याने चुरस वाढली आहे .**

वकील संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी ॲड.रवींद्र कीर्दत्त यांनी चार ऑगस्ट रोजी उमेदवाराची अंतिम यादी जाहीर केली आहे १९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते मात्र ॲड.धनंजय देशपांडे व मंदा शंखपाळे यांनी अर्ज मागे घेतले त्यामुळे आता निवडणुकीत १७ उमेदवार लढत आहे अध्यक्ष पदासाठी ॲड. सुभाष पिसूरे , ॲड.गणेश करंडे, ॲड.प्रशांत देशपांडे यांच्या मध्ये सामना होणार आहे तर उपाध्यक्षपदासाठी ॲड. रघुराज देशमुख , ॲड. शहादेव भंडारे,ॲड.संग्राम तुपे हे निवडणूक रिंगणात आहेसचिव पदा साठी सुभाष काळे, व ॲड.किशोर खेडकर हे उमेदवार आहे सहसचिव पदासाठी ॲड. धीरज कुमार कांबळे, पान २ वर

## तुकाराम मुंडेंची पुन्हा बदली

**मुंबई । प्रतिनिधी**



काम करणारा अधिकारी असला की त्याची बदली होणारच. आएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या बाबतीत असाच प्रकार घडत आहे. सध्या त्यांची सरकारने बदली केली असून २० वर्षात त्यांच्या २३ बदल्या झाल्या आहेत. एक प्रकारे चोखपणे कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्याला सरकारकडून बदल्यांच्या रुपात हे आगळेवेगळे बक्षिस आहे, असे म्हणावे लागेल.

राज्यातील धडाडीचे आयएएस अधिकारी अशी ओळख असलेल्या तुकाराम पान २ वर

## एमआयडिसीतील बेकारीला भीषण आग; दिड कोटीची हाणी



**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील पाव व खारी तोस चे प्रसिद्ध व्यापारी दिनेश मोरे यांच्या एमआयडीसी भागातील बेकरी प्लांटला आज सकाळी चारच्या दरम्यान शॉट सर्किटने भीषण आग लागली.या आगीत बेकरीतील त्यास साहित्य आणि आतील मशीनरी फर्निचर जाळून खाक झाल्याने जवळपास दिड कोटी रुपयाचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.**

शहरातील औदयोगिक वसाहतीमध्ये असलेल्या बेकारीच्या कारखान्याला सकाळी चारच्या दरम्यान अचानक आग लागली हि आग एवढी भयानक होती कि या आगीत आतील तयार बेकारीचे साहित्य फर्निचर जाळून खाक झाले घटनेची माहिती कळताच घटनास्थळी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलिम यांनी भेट दिली. एमआयडीसी भागात गेल्याअनेक वर्षापासून बेकरी पान २ वर

## चिमण्यांनी हात दाखवला कार थांबताच चालकाच्या डोळ्यात मिरची टाकून लुटले

**बीड/ आष्टी । प्रतिनिधी**

**लिप्ट मागण्यासाठी चिमण्या भोसले या ओळखीच्या व्यक्तीने हात केल्याने थांबलेल्या कार चालकांच्या डोळ्यात चटणी टाकून बळजबरीने रोख रकमेसह दोन मोबाईल असा साडेसहा लाख रूपयांचा ऐवज काढुन घेतल्याची घटना हरिनारायण आष्टा-जामगांव रोडवर घडली.या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात चार जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

आष्टी तालुक्यातील हरिनारायण आष्टा येथील मेडिकल चालक आदेश नवनाथ भवर हा रविवारी सायंकाळच्या दरम्यान स्वीप्ट कार क्रमांक एम.एच१६,सी.व्ही.६३२३ हिने हरिनारायण आष्टा-जामगांव रोडने जात असताना ओळखीतील पती,पत्नीने हात केल्याने थांबला,तेवढ्यात त्याच्या पत्नीने खाली उतरण्याचे सांगताच पतीने कार चालकांच्या डोळ्यात चटणी टाकली.आणि बाजूला असलेल्या अन्य दोघांनी येऊन तु उठू नकोस असे म्हणत असतानाच एकाने कारच्या समोरील पान २ वर




## धनंजय मुंडे-प्रकाश सोळंके समर्थकांत गटबाजी

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यात सगळ्यात जास्त आमदार असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट तयार झाल्याचे दिसून येत आहे. आधी आ. प्रकाश सोळंके समर्थकांच्या बॅनरवरून आ. धनंजय मुंडे यांचा फोटो गायब झाला तर आता अजित पवारांच्या स्वागतासाठी मुंडे समर्थकांनी लावलेल्या बॅनरवरुन सोळंके यांचा फोटो गायब आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे ७ ऑगस्ट पान २ वर

## आगामी निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट मशिन नसणार

### निवडणूक आयुक्तांची माहिती; झेडपी, महापालिका, नगरपालिकांचा समावेश

**नाशिक । प्रतिनिधी**




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट मशिन नसणार असल्याची माहिती निवडणुक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी नाशिक जिल्ह्यात आढावा दरम्यान दिली. निवडणुक आयोगाच्या या निर्णयाला विरोधकांकडून विरोध होण्याची शक्यता असल्याचे म्हटले जात आहे. तसेच मतदान केल्याची पावती सुध्दा मिळणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्वच राजकीय पक्ष आणि पान २ वर

## भटक्या-विमुक्त जातीतील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका वर्ग सुरू



**पाटोदा । प्रतिनिधी**

भटक्या आणि विमुक्त जातींतील बालकांच्या शिक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. समाजसेवक तसेच जीवजंतू कल्याण मंडळ, भारत सरकारचे सदस्य संतोष महाराज गर्जे यांच्या पुढाकाराने पाटोदा येथे अभ्यासिका वर्ग सुरू करण्यात आला आहे.

संतोष महाराज गर्जे हे भटके विकास परिषद, देवगिरी प्रांताचे जिल्हा सहसंयोजक म्हणून कार्यरत असून, समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, पशुसंवर्धन आणि धार्मिक क्षेत्रातही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. ते श्री अन्नपूर्णा देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संचालक असून, पाटोद्यामध्ये ''अन्नछत्र'', वृक्षसंवर्धन उपक्रम, आणि आता शैक्षणिक अभ्यासिका पान २ वर

### आरक्षण असूनही शिक्षणापासून वंचित

आरक्षित गटात येणाऱ्या बेरड, वासुदेव, गोंधळी, लोहार, कोल्हाटी, शिकलगार, बहुरूपी, वंजारा, धनगर, बेलदार, भराडी, कंजारभाट, कैकाडी, मसनजोगी, गोसावी अशा विविध भटक्या जातीजमातींच्या बालकांना शासनाने आरक्षण व सुविधा दिल्या आहेत, परंतु आधारकार्ड, जातप्रमाणपत्र, पत्त्याचा पुरावा नसल्यामुळे अनेक वेळा त्या सुविधा मिळवणे अशक्य होते.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०५ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३४.०० क्विंटल | २,००० | २,८०२ | २,६०६ |
| ज्वारी/हायब्रिड :४३.०० क्विंटल | २,१०१ | २,५०० | २,३५६ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : २१.५० क्विंटल | ६,००० | ६,४७१ | ६,२४० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: २९.०० क्विंटल | २,२०१ | २,८०१ | २,६३६ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,१०० | ४,६११ | ४,३५५ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ६,१०० | ५,९५० |

cmyk

## अग्रलेख

# प्रज्वलच्या रूपाने टोंनग्यांना चपराक !

जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाचा माजी खासदार प्रज्वल रेवण्णा याला बंगळुरूमधील विशेष न्यायालयाने बलात्कार प्रकरणात शनिवारी मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. प्रज्वल माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा नातू, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांचा पुतण्या असून त्याला पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. बंगळुरूमधील विशेष खासदार, आमदार न्यायालयाचे न्यायाधीश संतोष भट यांनी ३४ वर्षीय प्रज्वलला जन्मठेप आणि ११.५० लाखांचा दंडही ठोठावला. दंडाच्या रकमेतील ११.२५ लाख रुपये पीडित महिलेला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. न्यायालयाने शुक्रवारी लैंगिक शोषण व बलात्काराच्या ४ पैकी एका प्रकरणात रेवण्णाला दोषी ठरवले होते.

आपल्याला कमी शिक्षा देण्यात यावी, अशी विनंती त्याच्याकडून करण्यात आली होती. हसन जिल्ह्यातील होलेनारसीपुरा येथे देवेगौडा यांच्या कुटुंबीयांचे गन्नीकाडा फार्महाऊस आहे. तिथे काम करणा-या एका ४८ वर्षीय महिलेने २०२१ मध्ये प्रज्वलने २ वेळा बलात्कार केल्याचा तसेच ते कृत्य मोबाईलवर चित्रित केल्याची तक्रार दाखल केली होती. त्या प्रकरणी त्याला जन्मठेप आणि दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. सरकारी पक्षाने प्रज्वल रेवण्णाला जन्मठेपेची शिक्षा द्यावी, अशी विनंती केली होती तर प्रज्वलने आपण कोणताही गुन्हा केलेला नाही, असा युक्तिवाद केला होता. आपली राजकारणात वेगाने भरभराट झाली हीच आपली केवळ चूक आहे, असा दावा त्याने केला होता. गतवर्षी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रज्वलचे हे सेक्स स्कँडल समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. त्याने महिलांवर केलेल्या अत्याचाराचे चित्रीकरण असलेले अनेक पेन ड्राइव्ह या प्रकरणी नेमलेल्या एसआयटीच्या हाती लागले होते.

प्रज्वलने काही महिलांना नोकरी, पैशांसह विविध आमिषे दाखवून त्यांच्या सोबत लैंगिक संबंध ठेवले होते. रेवण्णा त्याच्या फार्महाऊसवर घरकाम करणा-या एका महिलेवरील बलात्कार प्रकरणात दोषी ठरला असून इतर प्रकरणांमध्येही त्याच्या विरोधात सबळ पुरावे आहेत. घरकाम करणा-या महिलेवरील बलात्कार प्रकरणी तपास करणा-या विशेष तपास दलाने (एसआयटी) सप्टेंबर २०२४ मध्ये ११३ साक्षीदारांच्या जबाबासोबत १,६३२ पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. रेवण्णाविरोधात बलात्कार, धमकी देणे आणि अश्लील छायाचित्र लीक करण्यासह विविध आरोप निश्चित करण्यात आले होते. त्याच्या विरोधात बलात्काराचे ४ वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. गतवर्षी ३१ मे रोजी त्याला बंगळुरू विमानतळावर अटक करण्यात आली होती. शुक्रवारी न्यायालयाने दोषी ठरवले तेव्हा न्यायालयातच तो रडला होता. सरकारी वकिलांनी रेवण्णा हा निर्ढावलेला आरोपी असून त्याने बलात्कारासारखे अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय कृत्य वारंवार केल्याने त्याला जन्मठेपेची शिक्षा द्यावी, अशी मागणी केली होती.

रेवण्णाला कठोर शिक्षा झाली तर असा गुन्हा करण्यापूर्वी कोणीही १० वेळा विचार करेल आणि समाजात योग्य तो संदेश जाईल, असा युक्तिवाद केला होता. प्रज्वल हा खासदार म्हणून निवडून आला होता. त्याला कायद्याची पूर्णपणे जाण आहे मात्र असे असतानाही त्याने लैंगिक अत्याचाराचे व्हीडीओ रेकॉर्ड करणे ही त्याची मानसिकता कशी आहे ते दर्शवण्यासाठी पुरेसे आहे. प्रज्वल हा निर्ढावलेला गुन्हेगार असून त्याने अशी कृत्ये वारंवार केली आहेत. त्याला एकाही कृत्याबद्दल पश्चात्ताप झालेला दिसून येत नाही. लोकशाहीत उत्तम चारित्र्याचा लोकप्रतिनिधी निवडून देण्याची जबाबदारी मतदारांवर असते; परंतु ब-याच वेळा प्रलोभने आणि प्रभावामुळे मतदार चुकीच्या उमेदवाराला निवडून देतात आणि पर्यायाने लोकप्रतिनिधी जनतेला गुलाम समजू लागतात. अशी परिस्थिती देशभरात सगळीकडेच दिसून येते. वास्तविक पाहता लोकप्रतिनिधी जनतेचे सेवक असतात; परंतु ते स्वत:ला मालक समजू लागतात. लोकप्रतिनिधींनी आपल्या पदाचा गैरवापर केला,

मनमानी केली तर त्यात गैर असे काही नाही अशीच जनतेची मानसिकता झाली आहे की काय, अशी शंका येते. खासदार पद भूषविलेला लोकप्रतिनिधी किती खालच्या पातळीला जाऊ शकतो हे प्रज्वल रेवण्णाला झालेल्या शिक्षेमुळे सिध्द झाले आहे. प्रज्वलवर लैंगिक शोषणाचे ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यावरून तो किती निर्ढावलेला आरोपी आहे ते दिसून येते. लोकसभा निवडणुकीत हसन मतदारसंघातील मतदान संपताच तो जर्मनीला पळाला होता. जर्मनीहून परतल्यानंतर त्याला पोलिसांच्या विशेष पथकाने बंगळुरू विमानतळावर अटक केल्यानंतर आणखी ३ महिलांनी त्याच्यावर बलात्काराचे आरोप केले होते. प्रज्वल त्याने केलेल्या प्रत्येक बलात्काराचे चित्रण करत असे. महिलांना ब्लॅकमेल करून धमकावण्यासाठी या चित्रीकरणाचा वापर केला जायचा. घरकाम करणा-या महिलेवरील बलात्काराच्या चित्रीकरणात ती बलात्काराला विरोध करत असल्याचे पोलिसांना दिसून आले आहे म्हणे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे पीडित महिला एसआयटीसमोर उपस्थित राहू नये यासाठी प्रज्वलचे वडील एच. डी. रेवण्णा आणि आई भवानी रेवण्णा यांनी तिचे अपहरण केले होते.

पोलिसांनी तिची सुटका केली आणि हे प्रकरण पोलिसांत दाखल झाले. राजकीय क्षेत्रात मानसन्मान मिळवलेले कुटुंब आपल्या प्रभावाचा वापर करत कसे गुन्हेगारी कृत्य करते याचे हे उदाहरण. एसआयटीने प्रज्वलवर आरोपपत्र दाखल करताना राजकीय दबावाला जुमानले नाही याबद्दल त्यांचे कौतुक करायला हवे. नेतेमंडळींच्या गुन्हेगारी प्रकरणांची माहिती सार्वजनिक करण्यात यावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने ५ वर्षांपूर्वी दिले होते. एका अहवालानुसार सध्याचे १५१ खासदार आणि आमदारांवर महिलांवर अत्याचार केल्याचे आरोप आहेत. यातील एक तृतीयांश लोकप्रतिनिधी भाजपचे आहेत. इतरही अनेक पक्षांच्या लोकप्रतिनिधींचा यात समावेश आहे. ज्या खासदारांवर कायदे तयार करण्याचे अधिकार आहेत ते जेव्हा अत्याचार करतात तेव्हा जनता कशी काय गप्प बसते? राजकारणी आणि जनतेमध्ये मोठे अंतर निर्माण झाल्याने असे होत असेल काय? जनतेचे रक्षण करणारे राजकारणीच भक्षक बनत असतील तर तो दोष त्यांना निवडून देणा-या जनतेचाच म्हणावा लागेल.

# श्री सोमेश्वर मंदिर येथे श्रीमद् भागवत कथेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी श्रीमद् भागवत महा कथेचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्रीमद् भागवत कथा श्रवण करून आपल्या जीवनाचा उद्धार करून घ्यावा असे आवाहन श्री सोमेश्वर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा विश्वस्त मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे या कथेसाठी कथाकार म्हणून हरिभक्त परायण नारायण महाराज



गिरी यांच्या वाणीतून ही कथा दिनांक सात आठ दोन हजार रोजी पासून संपन्न होणार आहे असे आवाहन करण्यात आले आहे ही श्रीमद् भागवत कथा हरिभक्त परायण महादेव महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर तसेच हरिभक्त परायण शिवाजी महाराज श्रीक्षेत्र नारायण गडकर यांच्या आशीर्वादाने संपन्न होत आहे तरी बीड शहरातील सर्व भाविक भक्तांनी ही श्रीमद् भागवत कथा श्रवण करण्याचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे यांनी केले आहे

# लुटमार करणाऱ्या दोन आरोपींना बीड शहर पोलीसांनी पकडले

**बीड । प्रतिनिधी**

**पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी मोटरसायकल चोरी आणि इतर चोऱ्यावर नियंत्रण करण्यासाठी सर्व ठाणेदार यांना सूचना दिल्या आहेत. बीड सरकारी रुग्णालयासमोरून डॉ. दिनेश भगवान तुपे, आशापुरा अपार्टमेंट बीड यांची अवेंजर मोटरसायकल चोरी गेली होती. परंतु बीड शहर डीबी पथकाने यात चांगली कामगिरी करून यातील मोटरसायकल चोर पुन्हा एकदा सापळा लावून काही तासातच पकडला आहे.**



ज्या ठिकाणाहून गाडी चोरी गेली होती त्याच ठिकाणी डीबी पथकाने सापळा लावला होता आणि हाच चोर तेथे गाडी चोरी करण्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास येथे आला आणि पोलिसांच्या सापळ्यात गाडी चोरी करत असताना अलगद अटकला. त्यास जागीच पकडण्यात आले आहे आणि त्याने काल चोरी करण्यात आलेली गाडी याची सुद्धा कबुली दिली. हॉटेल स्वराज समोर लावलेली डॉक्टर दिनेश तुपे यांची अवेंजर गाडी पोलिसांनी जाऊन ताब्यात घेतली आहे. अभिलेखावरील गुन्हेगार वैभव संजय वराट रा.आयटीआय कॉलनी बीड याने दिनांक २ .८ .२५ रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास बंजारा हॉटेल समोर भैय्यासाहेब नागनाथ सोनकांबळे रा. सम्राट चौक बीड. याचा मोबाईल आणि बाराशे रुपये नगदी असे पैसे असे जबरीने काढून घेतले. परंतु बीड शहर च्या डीबी पथकाने चांगली कामगिरी करत आरोपी वैभव वराट याला तात्काळ अटक केली आहे. त्याच्याकडून १२०० रुपये जप्त देखील केले आहेत. वैभव वराट यास दोन दिवस पीसीआर ची मागणी करण्यात आली आहे. यातील एक आणखी आरोपी अटक करणे बाकी आहे. या दोन्ही कारवाया पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ, पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार संजय राठोड, शहेंशा सय्यद, संदीप आघाव, अमर घुगे, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशील उगले, यांनी केली आहे. दोन्ही कारवाईबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



**आष्टीः तालुका पत्रकार संघाच्या वतीने माजी आमदार शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे सचिव शरद रेडेकर उपाध्यक्ष संतोष सानप कोषाध्यक्ष गणेश दळवी माजी अध्यक्ष भीमराव गुरव मनोज पोकळे**

# रस्त्याच्या प्रतीक्षेत मौजवाडी; पंचवीस वर्षांपासून विकासाच्या गप्पा

## कृती शून्य राज्यकर्त्यांवर किरण डावकरांचा आरोप

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरापासून अवघ्या २० किलोमीटरवर असलेले मौजवाडी हे गाव गेल्या पंचवीस वर्षांपासून रस्त्याच्या मूलभूत सुविधेपासून वंचित आहे. ''विकासाच्या नावाखाली केवळ फोडाफोडी सुरू आहे, आणि मौजवाडीच्या नशिबात अजूनही उपेक्षाच आहे,'' अशा तीव्र शब्दांत सामाजिक कार्यकर्ते किरण डावकर यांनी सत्ताधाऱ्यांवर ताशेरे ओढले आहेत.**



डावकर म्हणाले की, ''प्रत्येक निवडणुकीत नेतेमंडळी या गावात येतात, भाषणं करतात, उद्घाटनांचे ढोल बडवतात; पण निवडणूक संपली की मौजवाडी पुन्हा दुर्लक्षित होते.'' यामुळे येथील विद्यार्थ्यांना शिक्षण, रुग्णांना उपचार, आणि तरुणांना रोजंदारी या मुलभूत गरजांपासून दूर राहावे लागत आहे. त्यांनी असा आरोपही केला की, अपुऱ्या आरोग्य सेवांमुळे वेळेवर रुग्णालयात पोहोचता न आल्याने अनेक नागरिकांचे बळी गेले आहेत. ''मौजवाडी जिल्ह्याच्या नकाशावर आहे की नाही, असा सवालही येथील नागरिकांना आज पडतो आहे,'' असे डावकरांनी संतप्त स्वरात सांगितले आहे.

येत्या निवडणुकीत मौजवाडीतील युवकांनी ठाम निर्धार केला आहे की, 'मोजफाटा ते मौजवाडी' हा ४ किलोमीटरचा रस्ता पूर्ण होईपर्यंत मतदानावर बहिष्कार टाकण्यात येईल. ही भूमिका हे सरकार आणि राज्यकर्त्यांसाठी एक गंभीर इशारा आहे. डावकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''जर विकास झाला नाही तर यापुढे कोणत्याही नेत्याला मौजवाडीमध्ये प्रवेश करू दिला जाणार नाही. आता विकास हवा, आश्वासनं नाहीत.'' एकविसाव्या शतकातही मूलभूत सुविधा न मिळणे हे शासनाच्या अपयशाचे ठळक उदाहरण ठरत आहे. मौजवाडी सारखी गावे ही केवळ निवडणुकीच्या राजकारणासाठी आठवली जातात, ही शोकांतिका आहे.

# अजित पवार दोन दिवस बीडमध्ये

**बीड । प्रतिनिधी**



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. दिनांक ०६ ऑगस्ट रोजी दुपारी ०३.१५ हेलिकॉप्टरने पोलीस परेड ग्राउंड येथील हेलिपॅड, पोलीस मुख्यालय, बीड येथे आगमन नंतर दुपारी ०३.३० मोटारीने शासकीय विश्रामगृह, बीड येथे आगमन व राखीव नंतर मोटारीने प्रयाण सायं.०५.०० जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन व बीड जिल्ह्यातील विविध पतसंस्था मधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत आढावा बैठक सायं. ०६ वा. बीड जिल्हा विद्युत वितरण नियंत्रण समितीची बैठक सायं. ०६.३० बीड जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक सायं. ०६.४५ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नागरिकांसाठी - सेवामित्र सुविधेचे उद्घाटन सायं. ०७ बीड जिल्ह्यातील डॉक्टर व इंडियन मेडीकल असोसिएशन संघटनेसोबत चर्चा सायं. ०७. ३० बीड जिल्ह्यातील उद्योग व व्यापारी संघटनेसोबत बैठक मोटारीने शासकीय विश्रामगृह, बीड येथे आगमन व मुक्काम राहील.

पान १ वरून...

### एकदा पराभूत झालो म्हणून राजकारण सोडणार

बसला सध्या मतदारसंघांमध्ये आम्हाला मिळालेल्या मताधिक्याची टिंगल उडवली जाते मात्र इतिहास विसरून चालणार नाही छत्रपती संभाजी राजेंनी आपल्या दहा हजार सैन्याच्या बळावर औरंगजेबाच्या दहा लाखाच्या फौजीशी मुकाबला केला अश्या पद्धतीने आपण देखील येणाऱ्या काळात धोडया सैन्याच्या जोरावर आयेणारा जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये निवडणूक लढणार असून मात्र आम्ही लोकसभेमध्ये देखील पंकजाताई मुंडे यांचे इमान आयताबारीने काम केले यापुढेही करत राहणार मात्र त्यांनी आम्हाला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये न्याय जर दिला नाही तर आम्ही वेगळा निर्णय घेऊ असा देखील इशारा भीमराव धोंडे यांनी दिला आज त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या कार्यक्रमात कार्यकर्त्यांना उद्देशून बोलताना धोंडे साहेब पुढे म्हणाले की ही आमदारकी फार काळ नसती पाच वर्षाची असती हे निवडून आलेल्या गड्यांनी विसरू नये गोरगरिबाची कामे करावी पंचायत समितीमध्ये आमच्या कार्यकर्त्यांची कामे अडवली जातात त्यांना काम अडवणूक केली जाते आता आम्ही देखील जसास तसे तसे उत्तर द्यायला तयार आहोत वेळ पडली तर आता ग चंडी धरायला ही मागे पुढे पाहणार नाही अजय दादा मित्र मंडळाने आयोजित केलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीचे व आमदार भीमराव धोंडे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मतदार संघातून कार्यकर्ते बंधू भगिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते यावेळी युवा नेते अजय दादा धोंडे यांनी आपण मागची विधानसभा संपूर्ण ताकदीनिशी लढलो मात्र आपला पराभव झाला आता तो पराभव विसरून पुन्हा एकदा जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये आपल्याला सगळ्यांना एकत्रित येऊन ही निवडणूक जिंकायची आहे अजय दादा म्हणाले की कार्यकर्त्यांची विचारांची देऊन घ्यावं व्हावी याकरता आपण या बैठकीचे व अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन केले आहे तसेच मी आता जिल्हा परिषदेची निवडणूक लढणार असल्याचा देखील त्यांनी आपला निर्णय जाहीर केला विविध कार्यकर्त्याच्या भाषणामधून सध्याच्या भारतीय जनता पार्टीच्या आमदारांच्या व कार्यकर्त्यांच्या वागणुकीची दिसून आली यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर हे देखील आमदार धोंडे यांना शुभेच्छा देण्यासाठी मोरेश्वर मंगल कार्यालयातील कार्यक्रमात उपस्थित राहून आम्ही दोघे चांगले मित्र आहोत यापुढेही राहणार धोंडे साहेबांना उदंड आयुष्य लाभो अशी शुभेच्छा देताना भीमराव धोंडे हे असं व्यक्तिमत्व आहे हे काम एका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ आमची मैत्री ही मोठी घट्ट मैत्री आहे मात्र काही लोकांच्या वागणिकेमुळे मध्ये आम्ही दुरावलो होतो मोठ्या विश्वासाने नेत्यांबरोबर जे लोक काम करतात त्यांना न्याय मिळत नाही तर काड्या करणाऱ्यांना किंमत असते असे देखील दरेकर म्हणाले यावेळी पांडुरंग नागरगोजे हे धोंडे साहेबांना शुभेच्छा पर बोलताना म्हणाले की मुंडे साहेब हे नेहमी च मुंडे घराण्याची एकनिष्ठ राहिलेली नेतृत्वातून मग स्वर्गीय मुंडे साहेबांचे पंकजाताई असेल प्रीतम ताई असेल यांच्या प्रत्येक निवडणुकीमध्ये त्यांच्याशी एकनिष्ठ राहिले आहे यापुढेही राहणार मागे झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये नंबर दोन चे मतदान आपल्याला झालेले आहे येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीचे निवडणूक मध्ये संपूर्ण त्यांची चाचणी देखील मी सुरू केली असून एखाद्याला आर्थिक बाजू कमकुवत असल्यास त्याला मी मदत देखील करणार आहे मतदार संघातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून मी आनंद चॅटीबल संस्थेच्या माध्यमातून विविध शाखेचे कॉलेजेस सुरू केले आहे बी एम एस कॉलेज इंजिनिअरिंग डी फार्म बी फार्म फार्म कृषी डिप्लोमा, नर्सिंग विविध शाखेचे कॉलेजेस आपले या ठिकाणी सुरू आहेत हजारो विद्यार्थी यामध्ये शिक्षण घेत आहेत तर दोन हजाराच्या वर कर्मचारी या संस्थेमध्ये सेवा करत आहेत अशा पद्धतीने आपण संयमीपणाचे राजकारण करत आलो आहोत यापुढेही करत राहणार असे माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले यावेळी व्यासपीठावर भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते लालासाहेब कुमकर आरपीआयचे तालुका अध्यक्ष अशोक साळवे माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव खेडकर दशरथ दादा वनवे अँड यावेळी भाषणे झाली रत्नदीप निकाळजे पाटोदा बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे पाटोदा पंचायत समितीच्या माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड सुदाम झिंजुर्के बबन आवटे बबन सांगळे संजय विधाते पानसबळ माऊली दादा जगताप बबन आणि राव शिवाजी सूर्यवंशी देविदास शेंडगे राजपाल शिंदे पांडुरंग गावडे अशोक दहिफळे अशोक साळवे आदींची भाषणे झाली यावेळी अभय राजे धोंडे देविदास शेंडगे बाळासाहेब गर्जे अण्णासाहेब भोसले पाटोदा दिल्या.अभिष्टचिंतन व कार्यकर्ता मेळावा प्रसंगी युवा नेते अजय दादा धोंडे, अभय राजे धोंडे,रामराव खेडकर,अॅड.रत्नदिप निकाळजे,भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, अशोक साळवे,लालाभाऊ कुमकर,पांडुरंग नागरगोजे,सभापती सुवर्णाताई लांबरुड, पांडुरंग गावडे,सुदाम झिंजुर्के, संभाजी दहातोंडे, मधुकर जायभाय,उद्धव राठे,भागवत खरमाटे,सावळेराम जायभाय ,वैभव बडे,सरपंच दादा जगताप,औटे, राजपाल शेंडगे, देविदास शेंडगे,महारुद्र खेडकर,माऊली पाणसंबळ,बप्पा भिलारे, भाऊसाहेब धनवडे, संतोष सानप, विष्णू गायकवाड, बाबासाहेब गरकळ, अंकुश मुंडे,बंडु कराड, भाऊसाहेब धनवडे,स्वामी खेडकर,सुशिल कोळेकर, इंदुबाई गोल्हार,बाळासाहेब भुकन, सतिश झगडे, अस्लम बेग,संजय नालकोल, प्रशासकीय अधिकारी डी.बी.राऊत,डॉ.शिवदास विधाते,माऊली बोडखे, संजय शेंडे, राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आदीसह मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते मोरेश्वर मंगल कार्यालयात कार्यकर्त्यांच्या झालेल्या बैठकीचे रूपांतर सभेत झाले.

--------------

### पीएम किसानचे पैसे रोखले;

याबाबत माहिती देण्यात आलेली आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या वेबसाईटवर कोणती लाभार्थी योजनेतून वगळण्यास पात्र ठरू शकतात याबाबत माहिती दिली आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या वेबसाईटनुसार याबाबत प्रत्यक्ष पडताळणी होईपर्यंत अस्थायी रुपयात त्यांचा लाभ रोखण्यात आल्याची माहिती दिली.

---------

### वकील संघाच्या निवडणुकीत

अॅड.शेख फिरोज मिया खलिद तर कोषाध्यक्ष पदासाठी योगेश टेकाळे, अॅड.दिनेश नाटकर हे आहेत ग्रंथपाल पदासाठी अॅड.सय्यद अजीम सय्यद खाजा पाशा, अॅड.मच्छिंद्र ससाने, अॅड. राहुल सूर्यवंशी यांच्यात लढत होत असून महिला प्रतिनिधी पदासाठी मनीषा गडकर, अॅड. बबीता पडसेकर(शहाणे) यांच्यात सामना होणार आहे.

----------

### चिमण्यांनी हात दाखवला कार थांबताच

सीटवर ठेवलेले ६ लाख रूपये रोख, एक ४० हजारांचा आयफोन,व विवो कंपनीचा १० हजारांचा मोबाईल असे एकुण ६ लाख ५० हजार रूपयांचा ऐवज बळजबरीने काढुन घेतल्याची घटना घडली.याप्रकरणी आदेश नवनाथ भवर यांच्या फिर्यादीवरून आष्टी पोलिस ठाण्यात आरोपी चिमण्या मैदान भोसले,त्याची पत्नी नाव माहीत नाही,व अन्य दोन अनोळखी अश्या चार जणांविरूध्द कलम११९(१), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक एन.बी.सुर्यवंशी करीत आहेत.

-------------

### एमआयडिसीतील बेकारीला

व्यवसायात जिल्ह्यात नाव असलेले माऊली बेकरीला सकाळी चारच्या दरम्यान शॉर्टसर्किटने भीषण आग लागली या आगीमध्येबेकरीत असलेले तोस, खारी, ब्रेड , बनविणाऱ्या मशीन जळून खाक झाले आहेत, या साहित्यासह बेकरीत ठेवलेले सामान हे पण जळाले आहेत यामध्ये दिनेश मोरे यांचे तब्बल दीड कोटी रुपयांच्या आसपास नुकसान झाले असल्याची माहिती मोरे यांनी दिली.

----------------

### आगामी निवडणुकांमध्ये

नागरिकांनाही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहे. त्याच अनुषंगाने निवडणूक आयोगानेही तयारी सुरू केली असून राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी नाशिक जिल्ह्यात जाऊन आढावा घेतला. नाशिक विभागाअंतर्गत जेवढे जिल्हे येतात, त्यातील मनपा, झेडपी आणि नगरपालिका यांच्या निवडणुकांचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट मशिन नसणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, दिवाळीनंतरच निवडणुकांचा बिगुल वाजेल, असेही त्यांनी सांगितले.

**या कारणामुळे नसेल व्हीव्हीपॅट मशिन**

स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्व इलेक्शन एकत्रित करणेसाठी मनुष्यबळ कमी पडेल. त्यामुळे टप्याटप्याने निवडणुका घेतल्या जाणार आहेत. पण पहिले कोणते इलेक्शन होईल ते अद्याप निश्चित नाही. ऑक्टोबर अखेरनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रकियेला सुरुवात होईल मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकसाठी व्हीव्हीपॅट मशिन राहणार नाही, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली.

**निवडणूक आयोगाचा निर्णय तुघलकी – अंधारे**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट नसेल हा निवडणूक आयोगाचा निर्णय नुसता तुघलकीच नाही तर एकूण निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह लावणारा आहे, असे मत शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी व्यक्त केले आहे. तसेच, व्हीव्हीपॅट गायब करण्यापेक्षा औपचारिकता म्हणून निवडणुकीचा जो फार्स करत आहात तो फार्स न केलेला बरा, असेही त्यांनी म्हटले.

----------------

### धनंजय मुंडे–प्रकाश सोळंके

रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. यादरम्यान जिल्ह्यातील अनेकांचे पक्षात प्रवेश होणार आहेत. यामध्ये वडवणी येथील बाबरी मुंडे आणि राजाभाऊ मुंडे यांचा प्रमुख आणि महत्त्वाचा पक्षप्रवेश होत आहे. या पक्षप्रवेशाचे गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात बॅनर लागले असून त्या बॅनरवर आमदार धनंजय मुंडे यांचा कुठेही फोटो लावण्यात आलेला नाही. तर आज आमदार धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यांनी अजित पवारांच्या स्वागताचे बॅनर लावले असून त्यावर आमदार प्रकाश सोळंके यांचा फोटो टाळण्यात आलाय. यामुळे जिल्ह्यात चर्चा सुरू झाली आहे तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत दोन गट पडल्याची देखील जोरदार चर्चा होत आहे.

---------

### भटक्या–विमुक्त जातीतील विद्यार्थ्यांसाठी

वर्ग अशा विविध माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवत आहेत. संतोष महाराज गर्जे यांना वाटते की, शिक्षण हेच भटक्या समाजाच्या उन्नतीचे मुख्य साधन आहे. या समाजाने आजवर पारंपरिक व्यवसाय, कलात्मक खेळ आणि हातगाडी, फिरती विक्री यामार्फत उदरनिर्वाह केला. परंतु शिक्षणाच्या अभावामुळे अनेक योजना असूनही लाभ मिळवता आला नाही.''शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे, जो पेलतो तोच पुढे जातो,'' या विचारांवर विश्वास ठेवत त्यांनी अभ्यासिका वर्ग सुरू केला आहे.

**संघटनाची गरज आणि पर्यावरणाचे भान**

संतोष गर्जे महाराजांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नाही. वृक्षतोड थांबवण्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठीही ते कार्यरत आहेत. ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे'' या संत वाङ्मयातून प्रेरणा घेत ते जनजागृती करत आहेत.

-----------

### तुकाराम मुंडेंची

मुंडेंच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. तुकाराम मुंडे यांची असंघटीत कामगार विभागाच्या आयुक्तपदावरून बदली करण्यात आली असून ते आता राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असतील. तुकाराम मुंडे यांच्यासोबत इतर चार अधिकाऱ्यांच्याही बदल्या करण्यात आल्या असून त्यांची ही २० वर्षात २३ वी बदली आहे. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना मंत्री आणि राजकीय नेते कधीही एका जागेवर राहू देत नाहीत. तत्कालीन विभागीय आयुक्त सुनिल केंद्रकर, तुकाराम मुंडे यांच्यासह बऱ्याच अधिकाऱ्यांना बदल्यांच्या रुपाने सरकारकडून चांगले काम केल्याचे बक्षिस मिळत असल्याचे दिसते. एकंदरीत सरकारच्या अशा कार्यपध्दतीचा नागरीकांमधून मात्र निषेध करण्यात येत आहे.

------------------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ६ ऑगस्ट २०२५




## माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने श्रवणमासा निमित्त श्रीरामचरित्र मानसचे नवान्ह पारायण

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील राजस्थानी मंगल कार्यालयात माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने श्रावणमासा निमित्त रामायण पारायण वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. माजलगावच्या विख्यात गायिका श्रीमती छाया राजेंद्र शर्मा यांच्या सुमधुर वाणीमध्ये पारायणाचे गायन होत आहे.श्रीमती शर्मा या शहरातील स्वर्गीय बाबूलाल शर्मा यांच्या सुनबाई आहेत.आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात रुची असल्यामुळे आपल्या व्यस्त दैनदिनातुन वेळ काढून माहेश्वरी महिला मंडळाच्या आग्रहास मान देऊन छाया राजेंद्र शर्मा नवान्ह पारायण मध्ये निष्काम भावनेने संगितमय सेवा देत आहेत.या रामायण पारायण महाप्रसादाचे यजमान अनिता सुनील मालानी यांच्याकडे आसुन त्या प्रंसगी प्रभू रामचंद्रजीच्या प्रसंगानुसार देखावे या पारायणात सादर करण्यात येत आहेत.प्रत्येक दिवशी देखाव्यानुसार लहान मुलांची सजावट करून अतिशय भक्तीमय व आनंदी वातावरण पाठाचे संगीतमय मधुर वाणीतुन भक्तांना श्रवन करण्यास येत आहे. रामायणामधील त्याग,सदाचाराचे शिक्षण मिळत आहे.दि ०६ ऑगस्ट २०२५ पर्यंत हे पारायण चालू राहील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी या रामायण पाठाचा लाभ घ्यावा हि विनंती माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

### थोडक्यात....




## माजलगावात ऋतू हिरवा कार्यक्रम उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

संस्कार भारती संयोजन समिती माजलगावच्या वतीने रविवार दि.०३ ऑगस्ट २०२५ रोजी ऋतू हिरवा या सुरेल संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात नटराज पूजन आणि संस्कार भारती च्या ध्येय गीताने करण्यात आली. यावेळी आवर्जून उपस्थित संस्कार भारती देवगिरी प्रांत अध्यक्ष श्रीमती स्नेहल पाठक,प्रांत मंत्री प्रमोद वझे, जिल्हा सदस्य श्रीराम देशपांडे या सर्वांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे मनोगत झाले. नंतर मुख्य मैफिलीला सुरुवात झाली. यात श्रेया ठोंगे हिने राग मिया मल्हार ची बंदिश 'बरखा ऋतू झर लागी गायली तसेच कुणाल कुलकर्णी यांनी 'गरज गरज आज मेघ ही याच रागातील बंदिश गायली.चैतन्य जाधव यांनी संसाराचा धंदा हे भक्तीगीत सादर केले.श्रेया ठोंगे हिने ऋतू हिरवा, केतकीच्या बनी तिथे,गा गीत तू सतारी असे बहारदार गाणे गायले.कुणाल कुलकर्णी यांनी मर्म बंधातली ठेव ही, शब्दावाचून कळले सारे,बाजे मुरलिया या गीतांचे सादरीकरण केले. तसेच रानकवी ना.धो.महानोर यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त त्यांना आदरांजली म्हणून त्यांनी लिहिलेले चिंब पावसानं रान झालं हे गीत कुणाल आणि श्रेया यांनी गायले.या गीताला रसिक श्रोत्यांची भरभरून दाद मिळाली.तसेच शेवटी संगीत संयोजक संजय कुलकर्णी यांनी गावती रागातील एक भावगीत सादर केले.या कार्यक्रमासाठी गणेश विभुते, सुबोध देशपांडे, प्रवीण तिवारी यांनी अतिशय सुरेल अशी साथ संगत केली.तसेच कार्यक्रमासाठी प्रद्युम्न नवशिंदे,कुणाल दुगड,मृदुला नवशिंदे,तसेच जोगडे काका, मंजुषा देशपांडे, संपदा विटेकर, शारदा ठोंगे, रत्नपारखी काका, या रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता संस्कार भारती संयोजन समिती माजलगावच्या सर्वच सदस्यांनी परिश्रम घेतले. अश्या प्रकारे संस्कार भारती माजलगाव चा ऋतू हिरवा हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## आष्टी येथील जिनीअस गामा अबॅकस विद्यार्थ्यांचे यश



आष्टी । प्रतिनिधी

राज्यभरातून विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. या परीक्षेला मोठा प्रतिसाद मिळाला, आष्टी शहरात गेल्या १५ वर्षापासून गामा अबँकस केंद्र चालवणाऱ्या शिक्षिका ज्योती संजय पवार यांच्या अबॅकस केंद्राचे विद्यार्थ्यांने ही परीक्षा ५ मिनिटात शंभर गणिते आणि ८ मिनिटात शंभर गणिते सोडविणे अशा या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. विहान पारस मेहेर राज्यात प्रथम क्रमांक (रेनबो लेवल) आरव चंद्रकांत आजबे राज्यात तिसरा क्रमांक (१ ली लेवल ) समर्थ भागवत सुळे - राज्यात प्रथम क्रमांक (३ री लेवल) साईराज उत्तम भोपळे राज्यात तिसरा क्रमांक (४ थी लेवल ) आर्या अजिनाथ जमदाडे राज्यात तिसरा क्रमांक (४ थी लेवल) रोहन अशोक धोंडे राज्यात तिसरा क्रमांक (६ वी लेवल) रुद्राक्ष भरत आवारे राज्यात दुसरा क्रमांक (८ वी लेवल) तर कॉन्सीलेशन प्राईज साठी खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

# प्रॉपर्टीच्या वादातून व्यवसायिकाचा मृत्यू ; पाच जणांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**प्रॉपर्टी व्यवहारातून भागीदारांमध्ये निर्माण झालेल्या तणावामुळे अंबाजोगाईतील व्यवसायिकाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप मृत व्यक्तीच्या पत्नीने केला. या प्रकरणी त्यांच्या पतीच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचा ठपका ठेवत पाच जणांविरूद्ध अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल करण्यात आलेले व्यक्ती हे राजकारणातील बडी धेंड आहेत. या घटनेमुळे अंबाजोगाईत एकच खळबळ उडाली आहे.**

फातेमा शेख (वय ४०, रा.गांधीनगर, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या फिर्यादीत त्यांनी पती जावेद अली शेख यांचा मृत्यू सहव्यावसायिकांनी दिलेल्या मानसिक त्रासामुळेच झाल्याचे स्पष्ट नमूद केले आहे. जावेद अली यांचा प्लॉटिंगचा व्यवसाय होता. २८ जुलै २०२३ रोजी त्यांनी हमीद मुस्तफा खान (रा.रिसोड, जि.वाशिम) यांच्याकडून २० एकर १९ गुंठे जमीन सुमारे २४ कोटी ५० लाख रूपयांना खरेदी केली होती. या व्यवहारात अंबाजोगाईतील जलील नियाजोद्दिन शेख, शोएब आयुब कुरेशी, जिलानी बशीर कुरेशी, अनुप ललितमोहन जाजु, कुलदीप किशोर परदेशी, ईजाज फतरू अली आणि फेरोज अब्दुल सत्तार हे सहभागी होते. या जमिनीचे एन.ए (नॉन-ऍग्रिकल्चरल) रूपांतर दोन महिन्यांत होणार होते. मात्र, वेळेत रूपांतर न झाल्यामुळे व्यवसायात अडथळे निर्माण झाले आणि भागीदारांमध्ये वाद सुरू झाले. या पार्श्वभूमीवर शोएब कुरेशी व अनुप जाजू हे जावेद यांना वारंवार फोन करून धमकी देत होते, असे फातेमा शेख यांनी म्हटले आहे.



त्यामुळे जावेद अली यांनी माजेद इनामदार यांची घेतलेली अंदाजे ३ कोटी रूपयांची जमीन शोएब कुरेशी आणि अनुप जाजू यांच्याकडे तारण म्हणून ४ जानेवारी २०२५ रोजी नोटरी करून दिली होती. त्यानंतर रविवारी (दि.३ ऑगस्ट) रात्री १० वाजता राजीव गांधी चौकातील सुदर्शन धोत्रे यांच्या कार्यालयात प्रॉपर्टी संदर्भात बैठक झाली. बैठकीला जावेद शेख यांच्यासह शोएब कुरेशी, अनुप जाजु, माजी नगरसेवक दिनेश भराडिया, सचिन जाधव, सुदर्शन धोत्रे व वसीम कुरेशी उपस्थित होते. या बैठकीत जावेद यांना शिवीगाळ आणि जीवे मारण्याच्या धमक्या देत तारण ठेवलेल्या मालमत्तेची नोंदणी करण्याचा दबाव त्यांच्यावर टाकण्यात आला. या वादात जावेद यांना तीव्र तणाव आणि घाम आला. त्यांनी छातीत कळ येत असल्याचे सांगून रूग्णालयात जायची विनंती केली, मात्र त्यांना थांबविण्यात आले. अखेर वसीम कुरेशी यांच्या मदतीने त्यांना रूग्णालयात नेण्यात आले. परंतु, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सदर फिर्यादीवरून शोएब कुरेशी, अनुप जाजू, माजी नगरसेवक दिनेश भराडिया, सचिन जाधव आणि सुदर्शन धोत्रे या पाच जणांवर बीएनएस कलम १०५, ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत.

## अवैध अग्नीशस्त्र बाळगणाऱ्याविरुद्ध जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना । प्रतिनिधी

**जिल्ह्यात अवैध गावठी पिस्टल बाळगणारे इसमांची माहिती घेऊन कारवाई करण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या.**



त्यावरुन मा, अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांनी स्थागुशाचे अंमलदार यांना कारवाई करण्या बाबत मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने स्थागुशा चे अंमलदर यांनी ०५ ऑगस्ट रोजी जालना शहरातील पोलीस ठाणे तालुका जालना हद्दीत भक्तेश्वरनगर जालना येथे पेट्रोलींग करीत असताना गोपनिय माहीती च्या आधारे ईसम नामे करण किसन लांडगे रा भक्तेश्वरनगर यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक गावठी पिस्टल, दोन मॅग्झीन व एक खाली केलेली पिवळया धातुची पुंगळी जप्त केले आहे. आरोपी विरुध्द पोलीस ठाणे तालुका येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री अजयकमार बंसल, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, अनंत कुळकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जालना, श्री. उबाळे सहायक पोलीस निरीक्षक, श्री. खामगळ, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, विजय डिक्कर, इरशाद पटेल, रमेश काळे, धिरज भोसले, योगेश सहाणे सर्व स्थागुशा जालना यांनी केली आहे.

# दिव्यांग व्यक्तीच्या मागण्या तात्काळ मंजूर करा दिव्यांग संघटनेची मागणी

जालना । प्रतिनिधी

मतीमंद मुलांचे पालकत्व स्वीकारण्याची प्रकिया सुलभ करावी, अशी मागणी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेने जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. तसेच सहायक समाज कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये पाच ते सहा महिन्यापूर्वी दिव्यांग व्यक्तीचे जाग्या संदर्भात प्रस्ताव धूळखात पडून आहे. याप्रकरणी समाज कल्याण अधिकारी कोणताही निर्णय घ्यायला तयार नाही याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी समाज कल्याण अधिकारी राजू एडके यांना दिव्यांग व्यक्तीचे अर्ज तत्काळ सादर करण्याचेआदेश करावे अशी पण मागणी करण्यात येत आहे.



प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे मोहन मुंडे, सत्यभामा भोजने, शेख जावेद, आसाराम गायके, डीगंबर कुंटेवार, अनिता शेवाळे, संगिता बौपरे, ज्योती चव्हान, अंबड शहराध्यक्ष अर्जुन भुक्कन, भीमराव मांडलिक,रामकिसन साबळे, विजय चव्हान यांच्यासह दिव्यांग बांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की, मतिमंद मुलांचे पालकत्व अधिकृतपणे स्वीकारण्याची प्रक्रिया सुलभ करण्याची गरज आहे.जालना जिल्ह्यात २० वर्षांचे मतिमंद मुले घरीच खितपत पडून आहेत. त्यांच्या आई-वडिलांना देखील त्यांची योग्य काळजी घेणे अशक्य झाले आहे. त्यामुळे पालकत्व समिती स्थापन करून ही समस्या कायमची मार्गी लावावी. पालकत्व मान्यतेसाठीची कायदेशीर प्रक्रिया गुंतागुंतीची आणि वेळखाऊ असल्याने दिव्यांगांना शासकीय योजनांचे फायदे, शैक्षणिक व वैद्यकीय सुविधा मिळवणे कठीण झाले आहे. त्यामुळे या प्रक्रियेत सुधारणा करून दिव्यांग पालकांना दिलासा द्यावा,अशी मागणी अनेक महिन्यांपासून केली जात आहे.शासनाने दोनशे चौरस फुटांच्या भूखंडांसाठी अर्ज ऑनलाईन मागवले असले तरी अनेक दिव्यांग बांधवांकडे स्मार्टफोन, इंटरनेट किंवा डिजिटल साक्षरता नाही. त्यामुळे हे अर्ज ऑफलाइन स्वरूपात मागवण्यात यावेत. बीड जिल्ह्यात दिव्यांगांसाठी स्कूटी वाटपाची योजना राबवली जात आहे, मात्र जालना जिल्ह्यात अशी कोणतीही योजना अद्याप अस्तित्वात नाही. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व आमदारांच्या विकास निधीतून दिव्यांगांना स्कूटी वाटप करण्यात याव्यात, तसेच दिव्यांगांसाठी पाच टक्के निधी राखीव ठेवण्यात यावा, या मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाला नाही, तर १५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी संपूर्ण जिल्हाभरातून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. दरम्यान, दिव्यांगाच्या मागण्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हाधिकारी मित्तल यांनी यावेळी दिले.

## इनरव्हिल क्लब ऑफ अंबाजोगाईच्या अध्यक्षा सुरेखा सिरसट बेस्ट मोटिव्हेट प्रेसिडेंट अवॉर्डने सन्मानित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

खडकवासला (पुणे) येथे डिस्ट्रिक्ट असेंम्ब्ली कौशिका मध्ये एका शानदार कार्यक्रमात इनरव्हिल क्लब ॅफ अंबाजोगाईचा विविध पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला.



यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ.शोभना पालेकर, श्रीमती चारूलता चिंचणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या भव्य कार्यक्रमात अंबाजोगाई इनरव्हिल क्लबला विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुणे येथे ४१ वी इनरव्हिल डिस्ट्रिक्ट असेंम्ब्ली कौशिका दि.१९ व २० जुलै रोजी अत्यंत दिमाखात संपन्न झाली. डिस्ट्रिक्ट मधील प्रत्येक क्लबचा त्यांनी वर्षभरात केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव करण्याचा हा सोहळा असतो. या वर्षी इनरव्हिल क्लब ऑफ अंबाजोगाईच्या कार्याचे कौतुक सोहळ्यात खूप कौतुक झाले. इनरव्हिल क्लब अंबाजोगाईला यावर्षी तीन विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. या मध्ये प्रेस्टिजिअस अवॉर्ड अंबाजोगाई अध्यक्षा सुरेखा सिरसट यांना बेस्ट मिस पॅसिनेट प्रेसिडेंट, एक्सलंट अवॉर्ड फॉर हॅपी व्हिलेज प्रोजेक्ट ट्रॉफी, थर्ड रँक मॅक्झिमम अटेंडंस्? इन डिस्ट्रिक्ट इव्हेंटस्, जॉइन-द-चाईल्ड ऍण्ड युथ डेव्हलपमेंट, वुमेन्स एम्पावरमेंटचे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. क्लबच्या सदस्यांकरिता याप्रसंगी डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स मीट स्पर्धा येथे घेण्यात आल्या, त्यामध्ये अंबाजोगाई क्लबला दोन सुवर्ण, एक कांस्य, एक ब्राँझ असे चार मेडल्स मिळाले. यावेळी फॉरेंजिन लँग्वेज ॅनलाइन एज्युकेशन प्रोजेक्ट कमिटीने सन्मानपत्र देऊन सन्मान केला. इनरव्हिल क्लब ॅफ अंबाजोगाईने केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेतल्याने सर्वत्र त्यांच्या कामाचे कौतुक होत आहे. क्लब पदाधिकारी आणि क्लब मेंबर्सची साथ व विविध दानशूर व्यक्तींनी वेळोवेळी या सामाजिक कार्यात मदतीचा हात दिल्यामुळेच हे यश मिळाले आहे. असे इनरव्हिल क्लब ॅफ अंबाजोगाईच्या अध्यक्षा सुरेखा सिरसट यांनी नमूद करून सहकार्य करणाऱ्या सर्वांना धन्यवाद दिले आहेत.



## युवासेनेतर्फे मोफत छत्रीचे वाटप; बाजीराव चव्हाण यांच्या पुढाकाराने यशस्वी उपक्रम

बीड । प्रतिनिधी

राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे , युवासेना मार्गदर्शक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि युवासेना कार्याध्यक्ष . पुर्वेश सरनाईक यांच्या सक्षम नेतृत्वाखाली, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने इमामपूर येथे मोफत छत्री वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थी तसेच स्थानिक नागरिकांना पावसाळ्यात उपयोगी ठरणाऱ्या छत्र्यांचे मोफत वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या गरजा ओळखून, सामाजिक भान जपत बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम यशस्वीपणे पार पाडला. गावकऱ्यांनी या स्तुत्य उपक्रमाचे मनापासून स्वागत केले आणि युवासेनेचे आणि बाजीराव दादा चव्हाण यांचे मनापासून आभार मानले. कार्यक्रमास गावातील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी यूवासेनेचे प्रमुख पदाधिकारी, तसेच धर्मवीर प्रतिष्ठानचे सर्व सहकारी, ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक शिक्षकवृंद, पालक, व वरिष्ठ अनेक मान्यवर उपस्थित होते.

## शिवसेना नेत्याच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक!

**बीड जिल्हा शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे- जगताप, मुळूक, गलधर**



बीड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या अफाट यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेना मोठ्या ताकदीने कामाला लागली असून उद्या दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील हॉ. ग्रँड यशोदा येथे दु २.३० वाजता, धाराशिव येथील पदाधिकाऱ्यांची सायं. ४.०० वाजता आणि परभणी येथील पदाधिकाऱ्यांची सायं. ५.०० वाजता महाराष्ट्र राज्य उद्योगमंत्री उदयजी सामंत साहेब, शिवसेना उपनेते अर्जुनजी खोतकर साहेब, शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, माजी खा. राहुलजी शेवाळे साहेब, शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी साहेब, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीताताई चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला शिवसेना युवासेना महिला आघाडी यांचे जिल्हाप्रमुख, जिल्हा संघटक, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, तालुका संघटक, विधानसभा प्रमुख, विधानसभा संघटक, विधानसभा समन्वयक, शहर प्रमुख, शहर संघटक, शहर समन्वयक यांनीच फक्त बैठकीला उपस्थित राहावे अशा वरिष्ठांकडून सूचना आहेत. या आडवा बैठकीत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांबाबत विचार विनिमय, ध्येय धोरण ठरविण्यात येणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी कळवले आहे बीड जिल्ह्यासह धाराशिव, परभणी जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांन ची पण बैठक याच ठिकाणी होणार असल्याचे सांगितले आहे.

# आत्मोद्धारासाठी किर्तन मन लावुन ऐकले तरच प्राप्ती -राजेंद्र महाराज वाघमारे

वडवणी । प्रतिनिधी

डोंगरपट्यातील धुनकवाड येथे उंच डोंगराळ प्रदेशावर वसलेल्या धुनकेश्वर मंदिराला श्रावणाच्या दुसर्या सोमवारी भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली.पंचक्रोशीतुन हजारोंच्या संख्येने भाविक पाहिल्यानंतर किर्तन सेवेसाठी आलेल्या ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे गोंदीकर यांनी बारा ज्योतिर्लिंगाप्रमाणे धुनकेश्वराचा महिमा वाढल्याचे सांगितले. भक्तीमय समाजाच्या भावना आकर्षित करण्याची ताकद या दैवतामध्ये निश्चित असुन स्वत:च्या आत्मोद्धारासाठी किर्तन मन लावुन ऐकणे महत्वाचे. पतीचा अनादर करू नका. कारण जिथे अनादर होतो तिथे शंकर पावत नाहीत हेच शिवपुराण सांगते या शब्दांत महाराजांनी भाविक भक्तांना संबोधित केले.जंगल मे मंगल असं म्हणत डोंगराळ प्रदेशावर असलेल्या धुनकेश्वर मंदिराच्या दैवताचे कौतुक सुरूवातीलाच महाराजांनी करत भक्तांच्या नवसाला पावणारं दैवत असल्याचं त्यांनी सांगितलं. श्रावण दुसर्या सोमवारी श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या किर्तन सेवा आणि महाप्रसाद ज्यात सर्व ग्रामस्थांचा सहभाग होता. एवढ्या डोंगरकुशीवर वास्तव्य करणार्या धुनकेश्वराला जमलेली गर्दी पाहुन बारा ज्योतिर्लिंगासारखे स्वरूप असल्याचेही महाराज म्हणाले. बीड जिल्हा वारकरी संतांची भुमी असुन रामायणाच्या काळात लंका शोधीसाठी निघालेल्या प्रभु




रामचंद्राचे पाय भुमिला लागल्याने पवित्रता व्यापक असल्याचे ते म्हणाले. किर्तन सेवेसाठी भाविक बसतात तेव्हा मन शुद्धीकरण करून किर्तन सेवन केले तरच आत्मोद्धार होवु शकतो. अन्यथा यायचं म्हणुन यायचं आणि बसायचं म्हणुन बसायचं हा भक्तिमार्ग नसल्याचे त्यांनी सांगितले. अलीकडे शंकर भक्तीत महिलांची मोठ्या प्रमाणावर गर्दी याचे श्रेय त्यांनी मिश्रा महाराजांना दिलं. शिवाची आराधना मोफत आणि तो पावल्यानंतर भरमसाठ पण मनोभावे भक्ती भोळ्या महादेवाला आवडते. आपण समाजाला मार्गदर्शक करतो पण त्यापुर्वी आपल्या अंगी असलेली पात्रता तपासुन बघायला हवी हे सांगताना त्यांनी धर्माची गुढी हातात घ्यायची आणि अधर्माने वागायचं अशा बेगड्या अध्यात्मावर टिका केली. सर्वस्वाचा त्याग करून प्रसंगी संसाराचाही त्याग केला तर खर्या अर्थाने वारकरी तोच होवु शकतो धर्माच्या मंडपात रामकृष्ण उच्चारण करा आपल्या ह्रदयातील विकार बाहेर आपोआप पडल्याशिवाय रहाणार नाहीत हे सांगताना त्यांनी उपस्थित भाविकांना दोन्ही हात वर करत शिवभजन ठेका धरून म्हणायला लावले. विविध दृष्टांत आणि अध्यात्मिक संदर्भ देत महाराजांनी तब्बल दोन तास किर्तन सेवेच्या माध्यमातुन उपस्थित भाविकांना समजेल असे ज्ञानार्जन केले. धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या वतीने त्यांचा पुष्पहार,धुनकेश्वराची प्रतिमा देऊन सत्कार केला.कार्यक्रमाची सांगता महाआरती, महाप्रसादाने झाली.दरम्यान सोमवारी दर्शन घेण्यासाठी वडवणी, धारूर, माजलगाव आदी तालुक्यातुन मोठ्या प्रमाणावर भाविक भक्तांची गर्दी होती.यावेळी भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी,गायनाचार्य ह.भ.प तुळशीराम महाराज अतकरे, गायनाचार्य ह.भ.प. माऊली महाराज औटे,सुभाष महाराज आजबे,शिवाजी महाराज नांदे,मृदंगाचार्य माऊली महाराज सावंत यासह परिसरातील भजनी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा धार्मिक सोहळा सर्व ग्रामस्थ मिळुन साजरा करतात.

पान ६ वरुन...

### अतिक्रमण धारकास

सुचना बाळराजे पवार यांनी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांना केली आहे

यावेळी माहीती देतांना मुख्याधिकारी म्हणाले की शासन निर्णयानुसार २०१८ पासून पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्याची प्रक्रिया सुरु असून संजयनगर मधील अतिक्रमण धारकास टप्प्या टप्प्याने आदेश होऊन शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमण धारकास सरसकट पि.टी.आर वाटप करण्यात येणार आसल्याचे मुख्यांधिकारी विक्रम मांडुरके यांनी माहीती दिली आहे

आज दि.,५ रोजी बाळराजे पवारांच्या उपस्थितीत नगरपालिकेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळेस मा.नगराध्यक्ष सुशील जंवजाळ, यांच्या सह सर्व मा.नगरसेवक,पदाधिकारी व अतिक्रमण धारक उपस्थित होते

# ३८ कोटींच्या थकबाकीवर महसूल प्रशासनाची धडक कारवाई



पुणे : शेतकऱ्यांनी आपला घाम गाळून शेतात ऊस पिकवला, तो कारखान्यांना दिला. पण त्या ऊसाचे पैसे मिळेनात, महिने गेले, आशा संपत चालली होती. मात्र आता महसूल प्रशासनाने कडक पावले उचलल्यामुळे शेतकऱ्यांना थोडा दिलासा मिळतोय. सोलापूर जिल्ह्यातील दोन साखर कारखान्यांविरोधात थेट कारवाई करत प्रशासनाने त्यांच्या यंत्रसामग्रीवर सील ठोकले आहे.

गोकुळ शुगर (धोत्री) आणि जय हिंद शुगर (आचेगाव) या दोन कारखान्यांनी गेल्या गळीत हंगामात शेतकऱ्यांकडून ऊस घेतला. मात्र त्याचे पैसे तब्बल सात महिन्यांपासून थकले होते. ही रक्कम जवळपास ३८ कोटी रुपयांपर्यंत पोहचली आहे. शेतकऱ्यांनी अनेकवेळा आंदोलने केली, निवेदने दिली, पण कारखान्यांनी पैसे दिलेच नाहीत. त्यामुळे शेवटी महसूल प्रशासनाने थेट पावले उचलली. या दोन्ही कारखान्यांना साखर आयुक्त कार्यालयाकडून तीन वेळा नोटिसा देण्यात आल्या. पण तरीही पैसे भरले गेले नाहीत. त्यामुळे आरआरसी म्हणजेच ‘ ’ अंतर्गत जिल्हा प्रशासनाला थेट कारवाई करण्याचे आदेश दिले गेले. जिल्हाधिकाऱ्यांनी ३१ जुलैपर्यंतची अंतिम मुदत दिली होती. ती ही मुदत संपल्यावर अखेर गुरुवारी कारवाई झाली.

दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी स्वतः दोन्ही कारखान्यांना भेट दिली. दोन्ही ठिकाणी यंत्रसामग्रीवर सील लावण्यात आले. कारण कारखान्यांमध्ये इतर मालमत्ता उपलब्ध नव्हती. या सील केलेल्या यंत्रसामग्रीची जबाबदारी कारखाना व्यवस्थापनावरच टाकण्यात आली आहे. म्हणजे आता ती यंत्रे वापरता येणार नाहीत.

आश्वासनाचा भंग आणि पुढील टप्प्यातील कारवाई

या महिन्याच्या सुरुवातीला जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दोन्ही कारखान्यांनी लेखी आश्वासन दिले होते की ३१ जुलैपर्यंत पैसे भरतील. पण त्यानंतर एक रुपयाही दिला गेला नाही. त्यामुळे प्रशासनाला सक्त कारवाई करावी लागली. पुढील टप्प्यात या कारखान्यांची जमिनीदेखील जप्त करून लिलाव करण्याची शक्यता आहे. साखर आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार आता जमिनीचे आणि यंत्रसामग्रीचे मूल्यांकन करून लिलावाची प्रक्रिया सुरू केली जाईल.

शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित

या कारवाईमुळे शेतकऱ्यांच्या मनात न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. बँकांचे कर्ज फेडणे थांबले आहे. ऊसाचे पैसे मिळाल्याशिवाय त्यांची शेती पुढे जाऊ शकत नाही. त्यामुळे प्रशासनाने केलेली ही कडक कारवाई म्हणजे शेतकऱ्यांच्या पाठिशी उभं राहण्याचं ठोस पाऊल आहे. ही घटना इतर कारखान्यांसाठीही एक इशारा आहे शेतकऱ्यांचा पैसा थकवल्यास आता शासन गप्प बसणार नाही.

# जमनापारी जातीच्या शेळ्या पाळा; लाखोंचे उत्पन्न मिळवा



जमनापारी जातीच्या शेळीचे दूध लवकर खराब होत नाही. या जातीच्या शेळ्या दररोज सुमारे ४ ते ५ लिटर दूध देतात. त्याच वेळी या जातीचा स्तनपान कालावधी सुमारे १७५ ते २०० दिवस आहे आणि ही शेळी एका स्तनपानात ५०० लिटर पर्यंत दूध देते. याशिवाय शेळयांची जात सुधारण्यासाठी परदेशातील शेळीपालक भारतातून जमनापारी जातीची आयात करतात.

देशी-विदेशी बाजारपेठेत शेळ्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पहिले तर मांस आणि दुधासाठी शेळ्या पाळल्या जात आहेत. त्याची मागणी बाजारात नेहमीच असते. अशा परिस्थितीत चांगल्या जातीच्या शेळ्या-मेंढ्या पाळल्या तर दर महिन्याला चांगले उत्पन्न मिळू शकते. यामुळे पशुपालकांसाठी आज आम्ही एका चांगल्या जातीच्या शेळीची माहिती घेऊन आलो आहे. ज्याची दररोज चार ते पाच लिटर दूध देण्याची क्षमता आहे, ती म्हणजे जमनापारी जातीची शेळी. या जातीच्या शेळ्यांचे वजन दररोज सुमारे १२० ते १२५ ग्रॅम वाढते. जमनापारी जातीच्या शेळीबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

जमनापारी जातीच्या शेळीची किंमत : जमनापारी जातीच्या शेळीचे दूध लवकर खराब होत नाही. या जातीच्या शेळ्या दररोज सुमारे ४ ते ५ लिटर दूध देतात. त्याच वेळी या जातीचा स्तनपान कालावधी सुमारे १७५ ते २०० दिवस आहे आणि ही शेळी एका स्तनपानात ५०० लिटर पर्यंत दूध देते. याशिवाय शेळयांची जात सुधारण्यासाठी परदेशातील शेळीपालक भारतातून जमनापारी जातीची आयात करतात. या जातीच्या ५० टक्के शेळ्या सुमारे दोन मुलांना जन्म देण्यास सक्षम असतात. दूध, मांस, मुलांना जन्म देणारी आणि तिच्या शरीराचा आकार यामुळे जामनापारी जात बाजारात प्रसिद्ध आहे. या जमनापारी जातीच्या शेळ्यांची किंमत सुमारे १५ ते २० हजार रुपये आहे.

जमनापारी जातीच्या शेळीची वैशिष्ट्ये : जमनापारी जातीच्या शेळ्यांचा रंग पांढरा असतो. या जातीच्या शेळीला त्याच्या स्वादिष्ट मांसामुळे देशी-विदेशी बाजारपेठेत मागणी आहे. भारतात जमनापारी जातीच्या शेळ्या बहुतेक उत्तर प्रदेशातील इटावा भागात आढळतात. त्याचबरोबर या जातीच्या काही शेळ्या बिहार, राजस्थान आणि पश्चिम बंगालमध्येही दिसतात.

# जाणून घ्या सोडपत्र रद्द करण्याचा कायदेशीर मार्ग !



कुटुंबामध्ये अनेकवेळा जमिनीचे वाटप, मालमत्तेची विभागणी किंवा वारसाहक्कावरून आपापसात समजुतीने निर्णय घेतले जातात. कधी भावाने बहिणीला हक्क दिला, तर कधी भावाने भावाला मालमत्तेवरचा हक्क दिला. अशा वेळी एक दस्तऐवज तयार केला जातो, ज्याला ‘सोडपत्र’ म्हणजेच रिलीज डीड म्हणतात. हे दस्तऐवज कायदेशीर असतं आणि जर ते नोंदणीकृत (रजिस्टर) असेल, तर त्याला कायद्याचा आधार मिळतो. परंतु एकदा हक्क सोडल्यावर तो परत घेता येतो का, हा प्रश्न अनेक शेतकरी बांधवांना सतावत असतो. चला, याची सोपी आणि स्पष्ट माहिती समजून घेऊया.सोडपत्र म्हणजे काय असतं : सोडपत्र हे असं दस्तऐवज असतं ज्यामध्ये एखादी व्यक्ती आपल्या मालमत्तेवरचा किंवा जमिनीवरचा हक्क स्वेच्छेने आणि कोणतीही किंमत न घेता दुसऱ्याला देतो. उदाहरणार्थ, एक भाऊ आपल्या भावाला आपला वारसाहक्क सोडतो, तर तो एक प्रकारचं सोडपत्र तयार करतो. जर हे सोडपत्र नोंदणीकृत असेल, तर तेच कायद्याने मान्य केलं जातं.

एकदा सोडपत्र दिलं की ते रद्द होऊ शकतं का?

सर्वसाधारणपणे, नोंदणीकृत सोडपत्र रद्द करता येत नाही. कारण हे दस्तऐवज कायद्याने ‘अपरिवर्तनीय’ म्हणजेच बदलता येत नाही, असं मानलं जातं. पण काही विशेष परिस्थितींमध्ये न्यायालयात दावा करून ते रद्द करता येऊ शकतं. सोडपत्र रद्द होण्याच्या विशेष परिस्थिती कोणत्या असतात? कधी कधी सोडपत्र तयार करताना व्यक्तीवर दबाव टाकला जातो, चुकीची माहिती दिली जाते, किंवा थेट फसवणूक केली जाते. अशावेळी त्या व्यक्तीला आपल्या हक्काच्या संरक्षणासाठी न्यायालयात दाद मागता येते. त्याशिवाय काही वेळा एखादी व्यक्ती मानसिकदृष्ट्या सक्षम नसेल, म्हणजे तिची समज किंवा निर्णय घेण्याची क्षमता कमी असेल, तरी हे दाखवून सोडपत्र अमान्य ठरवता येऊ शकतं. तसेच, जर सोडपत्रामध्ये कायदेशीर चूक असेल जसं की त्याची नोंदणी न झालेली, साक्षीदार नसणे, चुकीचे तपशील असणे अशा परिस्थितीत ते रद्द होण्याची शक्यता वाढते.

सोडपत्र रद्द करण्याची कायदेशीर प्रक्रिया : जर कोणालाही असं वाटत असेल की त्याचं सोडपत्र चुकीचं घेतलं गेलं आहे, तर सर्वप्रथम संबंधित व्यक्तीला लिखित नोटीस दिली जाते. त्यानंतर स्थानिक सिव्हिल कोर्टात दावा दाखल केला जातो. या वेळी फसवणूक, दबाव किंवा इतर वैध कारणं न्यायालयात सादर करावी लागतात. पुरावे व साक्षीदारांच्या आधारे न्यायालयात सुनावणी होते आणि न्यायालयाचा निकाल अंतिम असतो.

शेतकरी बांधवांनी लक्षात ठेवावं . सोडपत्रासारखा दस्तऐवज हा खूप गंभीर आणि कायमस्वरूपी निर्णय असतो. एकदा तो नोंदवला गेला की, नंतर बदल करणं कठीण होतं. म्हणून, कुठल्याही नातेवाईकाच्या सांगण्यावर किंवा समजुतीवर भरवसा ठेवून असा निर्णय घेऊ नका. कायद्याचा सल्ला घेऊन, विचारपूर्वक निर्णय घ्या. फॅमिली सेटलमेंट किंवा घरगुती समजुती वेगळ्या पद्धतीने नोंदवल्या जाऊ शकतात, पण त्याही कायदेशीर दृष्टीने पाहिल्या जातात. त्यामुळे काहीही लिहून देताना नागरिक नोंदणी कार्यालयात रजिस्ट्रेशन करून, योग्य सल्ला घेणं गरजेचं आहे. हक्क एकदा दिला की तो परत घेता येईलच, असं नाही. म्हणूनच, कुठल्याही प्रकारच्या जमिनीच्या व्यवहारात पुढाकार घेण्यापूर्वी म्हणजेच हातावर सही करण्याआधी डोक्याने विचार करा.

# उसावरील लोकरी मावा व्यवस्थापन



गेल्या काही दिवसामध्ये सातत्याने होणारा रिमझिम पाऊस, मध्येच पावसाचे खंड पडणे आणि अन्य पोषक हवामानामुळे ऊस पिकावर लोकरी मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. लोकरी माव्यामुळे उत्पादनात सुमारे २६ टक्क्यापर्यंत घट, तर साखर उताऱ्यात ०.५ ते २.० युनिटने घट होऊ शकते. त्यामुळे या किडीपासून पिकाचे वेळीच संरक्षण करणे गरजेचे आहे.

लोकरी मावा : या किडीच्या पंख असलेली व पंख नसलेली अशा दोन्ही प्रकारात प्रौढ कीड आढळते. बिनपंखी लोकरी मावा जास्त नुकसानकारक असतो. मादी किडीच्या पोटातून बाहेर पडणारी प्रथम टप्प्यातील पिले पिवळसर किंवा थोडीशी हिरवट-पिवळसर रंगाची असतात. यांची लांबी सुमारे ०.७७ मि.मी. असून रुंदी ०.२७ ते ०.३८ मि.मी. दरम्यान असते. ही पिले अतिशय चपळ असून, त्यांच्या पोटाच्या मागील भागात दोन कॉरनिकल्स आढळतात. ही कीड आपल्या बाल्यावस्थेत एकूण चार वेळा कात टाकते. त्यामुळे बाल्यावस्थेचे चार टप्पे होतात. त्यातील तिसऱ्या टप्प्यापासून त्यांच्या पाठीवर पांढऱ्या रंगाचे लोकरीसारखे सूक्ष्म तंतू विकसित होतात.

ते विशेषतः पोटाच्या मागच्या भागात अधिक प्रमाणात दिसून येतात. हे तंतू किडीच्या संरक्षणासाठी तयार होणारे एक प्रकारचे मऊ व सुरक्षित आवरण असते. बाल्यावस्थेतील कीड मुख्यतः पानाच्या खालच्या बाजूला, मध्य शिरेच्या दोन्ही बाजूंना चिकटलेली दिसते; मात्र प्रादुर्भाव वाढल्यास ही कीड संपूर्ण पानावर पसरते. चौथ्या टप्प्यानंतर कात टाकून प्रौढ अवस्था विकसित होते. प्रौढ कीड फिकट पिवळसर रंगाची असून, तिची लांबी साधारणतः २.०९ मि.मी. आणि रुंदी ०.४७ ते ०.७८ मि.मी. दरम्यान असते. प्रौढ किडीला दोन जोड्या पारदर्शक पंख असतात. त्यावर शिरा स्पष्टपणे दिसतात. ही कीड लहान अंतरासाठी उडू शकते. पंखी मावा काळ्या रंगाचा असतो. मादी काळसर असून, पिले फिक्कट हिरवट रंगाची असतात.

जीवनचक्र : या किडीचे प्रजनन थेट पिलांना जन्म देण्याच्या स्वरूपात होते. एक मादी दररोज साधारणतः १५ ते ३५ पिलांना जन्म देते. सुमारे २० दिवसांच्या कालावधीत एक मादी एकूण अंदाजे ३०० पिलांना जन्म देऊ शकते. नवजात पिलांमध्ये माद्यांचे प्रमाण तुलनात्मकदृष्ट्या अधिक असते. पिलावस्था साधारणतः ६ ते २२ दिवसांची असते, तर प्रौढ अवस्थेचा कालावधी ३२ ते ५७ दिवसांपर्यंत असतो. संपूर्ण जीवनचक्र साधारणतः ३० दिवसांत पूर्ण होते.

पोषक वातावरण व प्रादुर्भावाचा कालावधी : या किडीचा प्रादुर्भाव मुख्यतः ढगाळ हवामान, रिमझिम पाऊस, १९ ते ३५ अंश सेल्सिअस तापमान आणि ८० ते ९५ टक्के सापेक्ष आर्द्रतेच्या वातावरणात आढळून येतो. सामान्यतः प्रादुर्भावास जून महिन्यापासून सुरुवात होते. तथापि, सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांमध्ये अधिक पोषक हवामान निर्माण झाल्यास प्रादुर्भावात लक्षणीय वाढ होते. हिवाळ्यामध्येही किडीचा प्रादुर्भाव कमी-अधिक प्रमाणात दिसून येतो, तर उन्हाळ्यामध्ये प्रतिकूल हवामानामुळे प्रादुर्भाव फारच नगण्य स्वरूपात राहतो. मऊ व रुंद पान असणाऱ्या, लवकर पक्क होणाऱ्या आणि जास्त साखर उतारा असणाऱ्या वाणांवर किडीचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात दिसून येतो.

किडीचा प्रसार : या किडीचा प्रसार मुख्यतः जोरदार वाऱ्याच्या प्रवाहामुळे होतो. कीडग्रस्त पाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेल्यास किडीचा प्रसार होण्याची शक्यता वाढते. गोड रसद्रव्य गोळा करण्यासाठी पिकांवर फिरणाऱ्या मुंग्याद्वारेही या किडीचा प्रसार होतो. कीडग्रस्त बेण्यांच्या वापरामुळे किंवा प्रादुर्भावग्रस्त शेतातून रोपे, अवजारे अथवा इतर सामग्री वाहतूक करताना किडीचा प्रसार नवीन क्षेत्रात होतो.

नुकसानीचे स्वरूप : या किडीची पिले व प्रौढ कीड अणकुचीदार सोंडेच्या साह्याने पानाच्या खालच्या भागातून रस शोषण करतात. रस शोषणाच्या प्रक्रियेनंतर ही कीड मधासारखा चिकट स्राव (हनीड्यू) उत्सर्जित करते. त्यावर कॅम्पोडियम नावाची काळसर बुरशी वाढते. यामुळे संपूर्ण पाने काळसर पडतात आणि अन्न तयार करण्याची (प्रकाशसंश्लेषणाची) प्रक्रिया मंदावते. कीडग्रस्त पानांवर मुख्य शिरेच्या दोन्ही बाजूंना आणि पानांवर पिवळसर ठिपके दिसून येतात. अशी पाने ठिसूळ होतात, कडा कोरड्या पडतात आणि पुढे जाऊन संपूर्ण पान वाळते. या किडीमुळे उसाचा रस शोषला जातो, परिणामी ऊस कमकुवत होतो, वाढ खुंटते आणि उत्पादनात सुमारे २६ टक्क्यांपर्यंत घट येते. याशिवाय साखर उताऱ्यातही ०.५ ते २.० युनिटपर्यंत घट होऊ शकते. एका एकाच पानावर सुमारे ८०० पर्यंत पिले व प्रौढ कीड आढळून येते. सात महिन्यांपेक्षा अधिक वयाच्या उसात तसेच खोडवा उसामध्ये या किडीचा प्रादुर्भाव अधिक तीव्रतेने जाणवतो.लोकरी मावा नियंत्रण : मावा ग्रस्त उसाच्या बेण्यांचा लागवडीसाठी वापर करू नये. लागवडीसाठी निरोगी व रोगमुक्त बेण्याचा वापरणे अत्यावश्यक आहे. पिकात हवा खेळती राहण्यासाठी पट्टा पद्धतीने लागवड करावी. शेत व बांध स्वच्छ व तणाविरहित ठेवावेत.

नैसर्गिक नियंत्रणासाठी : डिफा ऑफिडिव्होरा, लेडी बर्ड बीटल, मायक्रोमस, क्रायसोपा आणि सिरफीड माशी या परभक्षी कीटकांच्या अळ्या उसावरील लोकरी मावा मोठ्या प्रमाणात खातात. त्यामुळे या नैसर्गिक शत्रूचे संवर्धन करणे उपयुक्त ठरते.लोकरी मावा जैविक नियंत्रणासाठी डिफा ऑफिडिव्होरा किंवा कोनोबाश्रा ॲफिडिव्होरा यांचे १००० अळ्या प्रति हेक्टर किंवा मायक्रोमस यांचे २५०० अळ्यांची अंडी, ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीत दर १५ दिवसांच्या अंतराने शेतात सोडावीत. यामुळे मावा नियंत्रणास नैसर्गिकरीत्या मदत होते.



दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१५८३ : अमेरिका सर हम्फ्रे गिल्बर्ट यांनी उत्तर अमेरिकेत पहिली इंग्रजी वसाहत स्थापन केली
१८६१ : अमेरिकन सैन्यातील चाबकाचे फटके मारण्याची शिक्षा बंद करण्यात आली.
१९१४ : ओहायो मध्ये पहिले इलेक्ट्रिक ट्रॅफिक सिगनल बसवले.
१९६२ : कन्या नक्षत्रात पहिल्या ‘क्वासार‘ तार्याचं अस्तित्त्व सिद्ध करण्यात यश
१९६२ : नेल्सन मंडेला यांना तुरुंगात टाकण्यात आले. यानंतर १९९० मधे त्यांची सुटका झाली.
१९६३ : शीतयुद्ध आंशिक आण्विक चाचणी बंदी करार: अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सोव्हिएत युनियनने स्वाक्षरी केली.
१९६५: पाकिस्तानी सैन्याने साध्या वेषात घुसखोरी केल्यामुळे भारत पाकिस्तान युद्धाला सुरूवात झाली.
१९७३ : मार्स ६ अंतराळयान यूएसएसआर वरून प्रक्षेपित झाले.
१९९४ : इंडियन नॅशनल सायन्स ॲकेडमी तर्फे दिला जाणारा ’होमी जहांगीर भाभा पुरस्कार’ राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेले संचालक प्रा. इरोड सुब्रमणियन राजगोपाल यांना प्रदान
१९९७ : फ्रेन्च खुल्या लॉनटेनिस स्पर्धेत मिश्र दुहेरी गटात विजेतेपद मिळवणार्या महेश भूपतीला क्रीडा खात्यातर्फे २ लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर
१९९७ : रशियाच्या दोन अंतराळवीरांना घेऊन ’सोयूझ-यू’ हे अंतराळयान ’मीर’ अंतराळस्थानकाकडे रवाना
२०१६ : ब्राझिलमधे रिओ-डी-जानिरो येथे ३१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात होणार आहे.
२०१९ : भारत जम्मू आणि काश्मीर या परदेशाला राज्यचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू आणि काश्मीर, व लडाख असे विभाजन करण्यात आले.
२०२० : राम मंदिर, अयोध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विवादित जमिनीवर मंदिर बांधण्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर भूमिपूजन करण्यात आले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५० : फ्रेंच लघुकथाकार व लेखक गाय दी मोपासां यांचा जन्मदिन.
१८५२ : ब्रिटीश कालीन भारतातील उडीसा राज्यातील राष्ट्रवादी स्वातंत्रता सेनानी आचार्य प्यारे मोहन यांचा जन्मदिन.
१८५८ : वासुदेव वामन तथा ’वासुदेवशास्त्री’ खरे इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी (मृत्यू: ११ जून १९२४)
१८९० : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार इतिहासकार, लेखक, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू १९६१-१९६४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू १९४८, पद्मविभूषण, मराठी शुद्धलेखन महामंडळाचे अध्यक्ष, प्राचीन मराठी इतिहास आणि मराठ्यांचा इतिहास यांचे व्यासंगी (मृत्यू: ६ आक्टोबर १९७९)
१९०१ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१५ : पद्मश्री, पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार, सन्मानित प्रख्यात हिंदी कवी व शिक्षणतज्ञ शिवमंगल सिंग ‘सुमन’ यांचा जन्मदिन.
१९३० : नील आर्मस्ट्राँग चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (मृत्यू: २५ ऑगस्ट २०१२)
१९३३ : विजया राजाध्यक्ष लेखिका व समीक्षिका, ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा
१९४७ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी वीरेन डंगवाल यांचा जन्मदिन.
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी महेंद्र कर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)
१९६९ : वेंकटेश प्रसाद जलदगती गोलंदाज
१९७२ : अकिब जावेद पाकिस्तानी जलदगती गोलंदाज
१९७५ : काजोल अभिनेत्री

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८८२ : लुई (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म:८६३)
१८९५ : जर्मन तत्त्ववेत्ता, इतिहासकार, साम्यवादी, सामाजिक शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार आणि व्यवसायिक फ्रेडरिक एंगेल्स यांचे निधन.
१९५० : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वतंत्रता सेनानी व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचे निधन.
१९६२ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांनी गोळी झाडुन घेऊन आत्महत्या केली. (जन्म: १ जून १९२६)
१९८४ : रिचर्ड बर्टन अभिनेता (जन्म: १० नोव्हेंबर १९२५)
१९९१ : होंडा कंपनी चे स्थापक सुइचिरो होंडा यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर १९०६)
१९९२ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (जन्म: ५ फेब्रुवारी १९०५)
१९९७ : के. पी. आर. गोपालन स्वातंत्र्यसैनिक, कम्युनिस्ट व नक्षलवादी नेते (जन्म: )
२००० : लाला अमरनाथ भारद्वाज भारतीय क्रिकेटचे भीष्माचार्य, स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार व स्वतंत्र भारताचे पहिले शतकवीर
२००१ : ज्योत्स्ना भोळे संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६), विष्णूदास भावे पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, महाराष्ट्र विशेष गौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: ११ मे १९१४)
२०१४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार चापमॅन पिंचर यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९१४)

# बीड शहरात रस्त्याच्या मधोमध असणारे रोहित्र म्हणजे विद्युत बॉम्बच

## महावितरण, नगरपरीषद यांची टोलवाटोलवी तर लोकप्रतिनिधींच्या डोळ्यावर झापडं; जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार का?

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील चौकाचौकात आणि रस्त्याच्या कडेला असणारी रोहित्रे हि एखाद्या विद्युत बॉम्ब प्रमाणेच उभी असुन कधी या रोहित्राचा स्फोट होईल सांगता येत नाही. धोकादायक रोहीत्रे किमान १० अथवा त्यापेक्षा जास्त उंचीवर असणे बंधनकारक असताना ३ते ४ फुट उंचीवर असणा-या रोहित्रांमुळे बीडकरांचा जीव धोक्यात आहे.रोहित्राचा स्फोट होऊन त्यातुन उडालेल्या तेलामुळे रस्त्याने जाणारी मुले भाजल्याच्या घटना घडलेल्या आहेत.महावितरणच्या रस्त्याच्या मधोमध असणा-या धोकादायक डिपी हटविण्यात यावी अशी नागरीकांनी नगर परिषद आणि महावितरणला वारंवार मागणी करूनही प्रशासनाला याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येते.नगरपरीषद महावितरणकडे तर महावितरण नगरपरीषदेकडे बोट दाखवून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करत आहे. लोकप्रतिनिधींनी डोळ्यावर झापड बांधल्याने




त्यांना याचे गांभीर्य दिसून येत नसल्याने एकंदरीतच एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

कॅनॉल रोड ते तुळजापूर मध्ये अनेक यशवंतराव विद्यालय, शिवाजी विद्यालय तसेच विविध खाजगी कोचिंग क्लासेस , वसतिगृह या परीसरात आहेत. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरीकांची वर्दळ असणाऱ्या या परीसरात महावितरणची विद्युत डीपी रस्त्याच्या मधोमध आहे.रस्त्यावरून ये जा करणा-या शाळकरी मुलांना याचा धोका आहे.प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करते असा आरोप येथील रहिवासी उत्तमराव मिसाळ यांनी केला आहे.

बीड शहरात गेल्या २ वर्षात अनेक ठिकाणी शासनाच्या नगरोत्थान सुवर्ण जयंती योजनेंतर्गत जवळपास १४० कोटी रुपयांच्या सिमेंट क्रांकीट रस्त्यांची व नालींची कामे करण्यात आली.

मात्र रस्त्याच्या मध्यभागी व कडेला असलेली उघडी व जमिनीलगत असणारे रोहित्रे आणि पोल हटविण्यासाठी निधीची तरतूद नसल्याने वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी रोहित्र व विद्युतखांब काढण्याची तसदी संबंधित विभागाने घेतली नाही.काही ठिकाणी वीज रोहित्र ऐन वर्दळीच्या ठिकाणी आणि बाजारपेठेतच आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने आर्थिंग मधुन करंट, उघड्या तारा ,फ्युजची उघडी पेटी धोक्याचे कारण ठरण्याची शक्यता आहे.सुचना फलक,रक्षक संरचना किंवा सुरक्षा नसल्याने गंभीर अपघाताची शक्यता आहे. यासंदर्भात तक्रारी,निवेदने आणि आंदोलनानंतरही प्रशासनाला जाग येत नसल्याने एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे. शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड,तुळजाई चौक,राजीव गांधी चौक, बार्शी नाका,केएसके महाविद्यालय परीसर, बालेपीर,माने काम्प्लेक्स रोड, सुभाष रोड, जालना रोड,जुने एसपी कार्यालय,कंकालेश्वर मंदिर, अण्णाभाऊ साठे चौक, अहिल्यादेवी होळकर पुतळा, बलभीम महाविद्यालय, पंचशील नगर,शाहुनगर, मोमीनपुरा आदी ठिकाणी उघडे रोहित्र आणि त्यात उघडे फ्युज बाक्स, वीज वाहिनी उपकरणे धोकादायक स्थितीत आहेत. रस्ता रुंदीकरण करताना रोहित्रे व ईतर विद्युत उपकरणांचे स्थलांतर हे नगरपालिका व बांधकाम विभागाचे काम असल्याचे तर उघड्यावरील उपकरणांच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येईल असे प्रेमसिंग राजपुत्र अधिक्षक अभियंता महावितरण बीड परीमंडळ स्पष्टीकरण देतात.तर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी आंदोलन अनुषंगाने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांना दिलेल्या लेखी पत्रात शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी असलेले रोहित्र व विद्युत पोल महावितरणच्या मालकीचे असल्यामुळे ईतरत्र सुरक्षित ठिकाणी हलवुन नगरपरिषदेला सहकार्य करावे अशा आशयाचे पत्र अधिक्षक अभियंता महावितरण यांना दिले आहे.एकंदरीतच महावितरण आणि नगरपरीषदेच्या भोंगळ कारभार नागरीकांच्या मुळावर आला आहे.

# योगेश्वरी मंदिरास अद्यावत छबिना पालखी सप्रेम भेट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तथा कोकणस्थ ब्राम्हणांचे कुलदैवत श्री योगेश्वरी देवी मंदिरास बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळाच्या वतीने छबिना पालखी सप्रेम भेट देण्यात आली आहे. रविवार दि ३ ऑगस्ट रोजी बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळ पुणे यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील बर्वे कुटुंबाच्या वतीने शुद्ध सागवानी लाकडा पासून बनवलेली छबिना पालखी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संदीप बर्वे तसेच पुणे मंडळाचे अध्यक्ष तथा मिलिंद बर्वे यांच्या उपस्थिती मध्ये श्री योगेश्वरी देवी मंदिरास सस्नेह भेट देण्यात आली. या छबिना पालखीवर पुणे येथील कारागिरांनी अतिशय सुंदर असे कोरीव नक्षीकाम केले असून त्या नक्षीकामामुळे व त्यावरील रंगरंगोटी मुळे ही छबिना पालखी अतिशय आकर्षक व सुंदर दिसून येत आहे. या छबिना पालखीची विधिवत पूजा व देवीची आरती करून पालखी



मंदिर प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आली. या छबिना पालखीचा वापर प्रत्येक शुक्रवारी तसेच पौर्णिमेला काढण्यात येणाऱ्या श्री योगेश्वरी देवीच्या छबिण्यासाठी करण्यात येणार असल्याचे देवल कमेटीकडून बर्वे परिवारास सांगितले.

बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळाची स्थापना १९७४ साली असून सन २०२४ हे मंडळाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात आहे. मंडळाच्या वतीने आजपर्यंत विविध मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सहकार्य केले आहे. त्याचबरोबर रक्तदान शिबिर आयोजित करून वेळोवेळी गरजू रुग्णांना मदत करण्यात येते.महिला बचत गटांना त्यांच्या उन्नतीसाठी बाजारपेठ उपलब्ध होण्यास सहकार्य केले. विविध प्रकारच्या सामाजिक कार्यात देखील उत्स्फूर्त असा सहभाग बर्वे स्नेह मंडळाचा असतो. संपूर्ण महाराष्ट्रात या मंडळाचे एकूण दोन ते अडीच हजार सदस्य असून ''एक कुल एक कुटूंब'' या सौंज्ञावर आधारित बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळ हे आपले कार्य करीत आहे.

यावेळी बर्वे परिवाराच्या वतीने श्री योगेश्वरी देवीची देखील विधिवत पूजा करून दर्शन घेतले. मंदिर प्रशासनाचा वतीने मंदिर परिसरात केलेल्या सोयी सुविधा, स्वच्छता तसेच महाप्रसाद घेऊन समाधान व्यक्त केले. बर्वे स्नेहवर्धक परिवाराच्या वतीने श्री योगेश्वरी मंदिरास छबिना पालखी सप्रेम भेट देतांना देवल कमिटीचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, सचिव प्रा अशोक लोमटे, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, सदस्य अमोल लोमटे, प्रविण दामा, सतीश लोमटे, डॉ .संध्या जाधव यांच्यासह मंदिर प्रशासनाचे अन्य सदस्य देखील उपस्थित होते. शेवटी देवल कमिटीच्या ते करत असलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल सर्व संचालक मंडळाचा बर्वे कुल स्नेहवर्धक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# धुतेकर संगीत विद्यालयाचा विद्यार्थी सन्मान समारंभ

बीड। प्रतिनिधी

स्वरांजली बहुउद्देशीय संगीत शिक्षण संस्था संचलित धुतेकर संगीत विद्यालय, येथे नुकताच एक प्रेरणादायी आणि गौरवशाली सोहळा पार पडला. मार्च-एप्रिल २०२५ या सत्रात अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शास्त्रीय गायन व वादन परीक्षेमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ मोठ्या उत्साहात आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या यशाचा गौरव करणे आणि भविष्यातील वाटचालीसाठी प्रेरणा देणे हा होता. भारतीय संगीत परंपरेच्या संवर्धनात आपले योगदान देणाऱ्या या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी संस्थेच्या वतीने विशेष आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील मानाचा नवभारत एज्युकेशन अवॉर्ड या सन्मानाने पुरस्कृत असलेले मा. श्री. चंद्रकांतजी मुळे सर (मुख्य प्रशासकीय अधिकारी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था



आंबेजोगाई, सभापती चंपावती शिक्षण संस्था बीड, मराठवाडा विभागीय अध्यक्ष कनिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक संघटना) यांची प्रमुख पाहुणे म्हणून सपत्निक उपस्थिती लाभली होती. यांच्यासह संगीत विद्यालयाचे संचालक श्री. सुदर्शन धुतेकर सर, स्वरांजली संस्थेच्या संचालिका सौ. अंजली धुतेकर मॅडम, श्रीनिवासजी मुळे सर, सुनीलजी थोरात सर, सचिनजी मार्गे, दहिवाळ सर, संजय कुलकर्णी सर, सतीश छाजेड सर, तसेच केदारनाथ चव्हाण सर यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिनजी मार्गे यांनी तर आभार प्रदर्शन श्री सूनीलजी थोरात सर यांनी केले. सुत्रसंचालन श्री. अविनाशजी ढेरे यांनी अत्यंत सहज आणि रसाळ शैलीत केले. या समारंभात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि आनंद झळकत होता. या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलात्मक प्रवासास बळ मिळेल आणि ते पुढे जाऊन भारतीय संगीत क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन अतिशय शिस्तबद्ध आणि आत्मीयतेने पार पडले. संपूर्ण कार्यक्रमातून संस्थेचा विद्यार्थी-केंद्रित दृष्टीकोन व संगीत क्षेत्रातील गुणवत्तेबाबतची बांधिलकी स्पष्टपणे जाणवली.

# खामगाव येथे शेतकरी मेळावा व पोखरा योजना मार्गदर्शन शिबिर



बीड। प्रतिनिधी

खामगाव (ता. जि. बीड) सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकू) कृषी महाविद्यालय, बीड यांच्या विद्यमाने ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम व कृषी औद्योगिक जागरूकता उपक्रम अंतर्गत शेतकरी मेळावा व पोखरा योजना मार्गदर्शन शिबिर २०२५ चे आयोजन दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८ वाजता खामगाव येथे करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.जी.व्ही. साळुंके (सहसचिव श्री अनंत कृषी विकास प्रतिष्ठान, बीड) हे लाभले होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एस.पी.मोरे (प्राचार्य , सौ.के.एस.के.(काकू)कृषी महाविद्यालय,बीड), उपस्थित होते , तसेच बी. एस.नाईक (सहायक कृषी अधिकारी ) यांनी शेतकऱ्यांना विविध योजनांविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला सरपंच मन्ना बी. मुझफ्फर शेख, चेअरमन भैय्या बुधनर व सर्व ग्रामस्थ आणि शेतकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्याचे आयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.व्हि.राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदूतांकडून करण्यात आले. यावेळी मार्गदर्शनासाठी प्रा.ए.पी. ढोरमारे यांनी खरीप पिकांतील किड व्यवस्थापन, तर इंजि.डी.डी.शिंदे यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाची गरज या विषयांवर अत्यंत उपयुक्त माहिती दिली.विद्यार्थ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला.

# छाया पांचाळ मृत्यू प्रकरणात दोषींवर कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन

बीड। प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयात प्रसुतीदरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या छाया गणेश पांचाळ या महिलेच्या मृत्यू प्रकरणात दोषी डॉक्टर आणि नर्स यांच्यावर कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करत केवळ परिचर मावशीवर निलंबनाचे नाटक व कारवाई केल्याचा आरोप करत दोषींची पाठराखण करणा-या बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्यासह डॉक्टर व नर्स यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्या किष्किंदा पांचाळ, अध्यक्ष विश्वकल्याण महिला सेवाभावी संस्था यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि.०४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री,




उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड आरोग्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

बीड तालुक्यातील आंबिल वडगाव येथील छाया गणेश पांचाळ वय वर्षे २५ यांचा १३ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात प्रसुतीनंतर अतिरक्तस्रावामुळे मृत्यू झाला होता. यासंदर्भात वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणि नर्सची हलगर्जीपणा जबाबदार असल्याचा आरोप करण्यात आला. असून मृत महिलेच्या भावाने पोलिस ठाण्यात लेखी तक्रार देत एफआयआर दाखलही केला आहे.या प्रकरणाची चौकशी समिती नेमण्यात आली असून त्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र चौकशी अहवालाच्या आधारे मुख्य दोषींना वाचवून फक्त कक्ष सेवक परिचय मावशी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मुख्य जबाबदार डॉक्टर आणि नर्स यांची पाठराखण करण्यात आली आहे

यावेळी आंदोलनात मयत छाया पांचाळ यांचे पती गणेश बापूराव पांचाळ. त्यांची दोन लहान चिमुकली मुले, रामधन जमाले( इंटक जिल्हाध्यक्ष) हेमंत पायाळ, दत्ता सुरवसे, श्रीकृष्ण जगताप, (तालुकाध्यक्ष आम आदमी पार्टी) भीमराव कुठे (शिवसेना बीडचे कार्यकर्ते), रमेश पांचाळ, भाई आजमखान, पोपट कांबळे, नितीन येडे, बाळू येडे, सुजित वाघमारे, बबन वाघमारे, नितीन मजमुले, अनिकेत दाभाडे, सोमनाथ ढवळे, सतीश डोरले, सुरेखा डोरले, अश्विनी पांचाळ, सुनीता भालेकर, मनीषा पांचाळ, जयश्री पांचाळ, कोमल चांदणे, नितीन जायभाय, आकाश कळसकर, शुभम भालेकर, सतीश डोरले, पठाण रफिक, ज्ञानेश्वर शिंदे, बाळासाहेब मोरे (बालाघाट परिसरातील समाजसेवक) आदींसह शेकडो समाज बांधव सहभागी होते.

# सपोनि राजेश गडवे यांचा वाळू तस्करांना दणका

तलवाडा । प्रतिनिधी



पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांब्यामध्ये प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी पहिल्याच दिवशी चकलांबा पोलीस ठाण्यामध्ये हजर झाल्यावर पोलीस ठाणे चकलांबा अंतर्गत दूरक्षेत्र उमापूर हद्दीतील गुंतेगाव वाळू तस्करांवर कारवाई केली आहे.

गोदापात्रात केलेल्या या कारवाईत ७,९३,००० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चकलांब्या हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी हजर झाल्यानंतर पहिल्या च दिवशी वाळू तस्करांवर मोठी कारवाई केली आहे. सोमवार (दि.४) गुंतेगाव येथे पहाटे ५. च्या सुमारास गोदावरी नदी पात्रात एक ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार राजेश गडवे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवाईचे आदेश दिले.त्यानुसार पोउपनी तांगडे साहेब , पोकाँ चांदमारे, पोकाँ प्रशांत घोंगडे, पोकाँ हनुमान इंगोले ,होमगार्ड सुरेश चव्हाण आदींनी मिळून छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे टॅक्टर व आढळून आले. त्यानुसार २३ १३७० असे असलेले जुने टॅक्टर वापरले त्याची किंमत अंदाजे ७,००,०००/-रू व त्याच्या पाठीमागे दोनटायरी लोखंडी ट्रॉली कि. अं .९०,००० त्यामध्ये एक ब्रास वाळू किंमत ३०००/ रू असे एकूण ७,९३,००० /रू असून या कारवाईत मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी सुदर्शन गुलाबराव गोरडे वय ४३ वर्षे रा .गुंतेगाव ता . गेवराई यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला . कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत,अप्पर उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी राजेश गडवे व पोउपनि तांगडे ,हनुमान इंगोले, चांदमारे, प्रशांत कल्याण घोंगडे, होमगार्ड सुरेश चव्हाण आदींनी केली आहे.

# सेवानिवृत्ती म्हणजे शेवट नाही, तर नव्या अध्यायाची सुरुवात आहे -चंद्रशेखर बर्दापूरकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाई येथे कृतज्ञता सोहळा व माजी विद्यार्थी स्नेह मिलन मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर अध्यक्ष योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, सेवानिवृत्ती म्हणजे शेवट नाही, तर नव्या अध्यायाची सुरुवात आहे.




दरम्यान या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे अनिकेत लोहिया (कार्यवाह मानवलोक अंबाजोगाई) प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांची उपस्थिती होती. सत्कारमूर्ती डॉ. रमा पांडे यांच्या हस्ते परिसरामध्ये सोनचाफा झाड लावून व बाबुजी आणि भाभी यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच डॉ. अरुंधती पाटील व विद्यार्थी यांनी तू बुद्धी दे तू तेज दे या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली.कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी विद्यार्थी संघाचे संचालक अजित कांकरिया यांनी प्रास्ताविक मध्ये त्यांनी महाविद्यालया च्या २५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेत महाविद्यालयाने समाजकार्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉक्टर रमा पांडे मॅडम यांच्या सेवानिवृत्ती निमित्त स्नेह मिलन मेळाव्याचे आयोजन करण्यामागचे भूमिका स्पष्ट केली. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या विविध लेखांचे परीक्षण करून त्याचे पुस्तक तयार करण्यात होते त्याचे डॉ. अरुंधती पाटील संपादित, समाजकार्य शिक्षणातील प्रेरणा आणि योगदान या पुस्तकाचे प्रकाशन सर्व प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांनी महाविद्यालय व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आपल्या कार्यातून व ज्ञानातून महाविद्यालयात विद्यार्थी घडवत आहेत.पंचवीस वर्षात महाविद्यालयातून शिक्षण घेऊन सद्यस्थितीत विद्यार्थी सरकारी, खाजगी व स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात काम करत महाराष्ट्र नाही तर देश पातळीवर घेऊन गेलेले आहेत. रमा पांडे या सेवा निवृत्त होत नाहीत तर त्यांच्यावर आणखीन मोठी जबाबदाऱ्या महाविद्यालय देणार आहे असे आश्वासित केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयाने केलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात्मक उपक्रमांची माहिती दिली तसेच माजी विद्यार्थी यांनी कॉलेज डेव्हलपमेंट मध्ये आपले योगदान द्यावे ही अपेक्षा व्यक्त केली. यावेळी सेवानिवृत्त होणाऱ्या प्राध्यापक डॉ. रमा पांडे यांना माजी विद्यार्थी संघाकडून व संपूर्ण विद्यार्थ्यांकडून आणि सहकाऱ्यांकडून तसेच मानवलोक संस्थेकडून कृतज्ञता भावनेने गौरविण्यात आले. त्यांचे शिक्षणातील योगदान, मार्गदर्शन व विद्यार्थ्यांवरील प्रभाव याचा उल्लेख करत विविध वक्त्यांनी आपली मनोगत व्यक्त केले. तसेच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा सहभाग विशेष आकर्षण ठरला. विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन करत महाविद्यालयाबद्दलच्या व डॉ .रमा पांडे यांच्या सेवापूर्ती कार्यक्रम विषयीच्या भावना व्यक्त केल्या. सेवानिवृत्ती म्हणजे शेवट नाही, तर नव्या अध्यायाची सुरुवात आहे. आजपासून त्यांचा वेळ हा स्वतःसाठी, कुटुंबासाठी आणि नव्या छंदांसाठी आहे. त्यांच्या पुढील जीवनाला आरोग्य, आनंद, आणि समाधान लाभो, हीच शुभेच्छा!या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी सुषमा, प्रतिमा, राहुल व राखी या सदस्यांनी तर आभारप्रदर्शन माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष डॉ. हनुमंत साळुंके यांनी केले. सदरील कार्यक्रमास आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मानवलोक चे सर्व कार्यकर्ते माजी विद्यार्थी संघाचे सर्व संचालक व एम. एस. डब्ल्यू प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# आसरडोह येथे रस्त्यासाठी ग्रामस्थांनी केला रस्ता रोको



धारूर। प्रतिनिधी

किल्लेधारुर तालुक्यातील आसरडोह येथे नियोजित ठरल्या प्रमाणे आडस,आसरडोह ,उमरेवाडी, केकानवाडी, मोरफळी,रूई धारूर व सर्व तांड्यातील सुजान नागरिक,सामाजिक कार्यकर्ते,राजकीय कार्यकर्ते,सर्व पदाधिकारी , वाहनधारक यानी रवीकिरण आबासाहेब देशमुख यांच्या नेतत्वाखालीदिनांक ०२.०८.२०२५ वार शनिवार रोजी सकाळी ९ वाजता आपण आसरडोह बस स्थानक येथे दिंद्रूड ते बनसारोला रस्ता जो आडस मार्गे जातो या रस्त्याच्या दुरस्तीसाठी रस्ता रोको केले. शासनाला जागे करन्यासाठी रस्ता रोको पार पडला.

आपली भूमिका मांडताना रवी देशमुख यांनी सक्षम आधीकरी यांनी ठोस भूमिका घेऊन लेखी आश्वासन दिल्याशिवाय आम्ही रस्ता मोकळा करणार नाहीत ही भूमिका मांडली .शेवटी तहसीलदार निळे साहेब यांनी लेखी आश्वासन देऊन संबधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत गेली २० वर्ष हा रस्ता नादुरुस्त आहे या मागणीसाठी सदरील रस्ता रोको संपन्न झाला.रस्ता रोको दरम्यान पंच क्रोशितील नागरिक हजर होते. ३७/१ कलमा खाली रविकिरण देशमुख,विनोद देशमुख,सूरज देशमुख, खंडू बिटे,जीवराज देशमुख यांना अटक झाली. व कार्यवाही करून सोडून देण्यात आले. प्रशासना तर्फे , तहसीलदार निळे साहेब, सह पोलीस निरीक्षक वाघमोडे साहेब,पांडे साहेब , गीर धावर बोर्जे,तलाठी पाखरे,पोलीस कर्मचारी सिद्धेवाड,सार्वजनिक बांधकाम खात्याचे भामरे इत्यादी उपस्थित होते.

# जिल्हाभरात अवैध व्यवसायावर कारवाई करून बीड पोलिसांनी १ कोटी ४४ लाखाचा मुद्दामाल घेतला ताब्यात

## अंबाजोगाई उपविभागात अवैध दारू विक्रीच्या सर्वाधिक कारवाया






**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, आष्टी, अंबाजोगाई ,केज, माजलगाव या उपविभागामध्ये बीड पोलिसांनी दारूबंदी, जुगार ,गुटखा, गांजा विक्री अशा अवैध व्यवसायावर कारवाई करून २८० गुन्हे दाखल करून या व्यवसायातून १ कोटी ४३ लाख ९९ हजार ३१४ रुपयाचा मुद्देमाल ताब्यात घेतला. या कारवाईमुळे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी अधिकारी आणी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.**

बीड जिल्ह्यातील बीड उपविभागामध्ये दारूबंदीच्या २९ जुगाराच्या, बारा अवैध गुटखा विक्रीच्या दोन अशा ४३ कारवाया करून या कारवयातून २१ लाख ३७ हजार ७५३ रुपयाच्या मुद्देमाल जप्त केला. गेवराई उपविभागा अंतर्गत दारूबंदी २२ ,अवैध दारू विक्री २२, जुगाराच्या १३ ,गुटका विक्रीची एक अशा ३६ कारवाया करून ३१ लाख ९हजार ९०८ मुद्देमाल जप्त केला. आष्टी उपविभागामध्ये दारूबंदीच्या ३४ जुगाराच्या १३ ,अवैध गांजा विक्रीच्या दोन अशा ४९ कारवाया करून १३ लाख ४६ हजार ७८६ रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. अंबाजोगाई उपविभागांमध्ये अवैध दारू विक्रीच्या ६२, जुगाराच्या १९, अवैध गुटखा विक्रीच्या दोन अशा ८३ कारवाया करून ३० लाख २४ हजार ९२३ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. केज उपविभागामध्ये दारू विक्रीच्या १५, जुगाराच्या पाच, अवैध गुटखा विक्रीची एक व गांजा विक्रीची एक अशा २२ कारवाया करून ९ लाख १४ हजार १५५ रुपयांच्या मुद्देमाल जप्त केला. माजलगाव उपविभागामध्ये दारूबंदीच्या ३० ,जुगाराच्या दहा, अवैध गुटखा विक्रीच्या सात कारवाया करून एकूण ४७ कारवायांमध्ये ३९ लाख ६५ हजार ७९७ रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. सर्वाधिक कारवाया अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई विभागामध्ये करण्यात आल्या असून या विभागात अवैध दारू विक्रीच्या १०७ ,जुगाराच्या ३४, गुटका विक्रीच्या १० तर गांजा विक्रीची एक कारवाई अशा १५२ कारवाया करून ७९ लाख ४८७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बीड जिल्ह्यामध्ये एकूण २८० कारवाया करून दारूबंदीच्या १९२, जुगाराच्या ७२, गुटखा विक्रीच्या १३,तर गांजा विक्रीच्या तीन अशा कारवाया करून आरोपींकडून एक कोटी ४३ लाख ९९ हजार ३१४ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. असून बीड जिल्ह्यामध्ये अवैध धंदे बंद करण्याचा विडाच पोलीस अधीक्षकांनी उचलल्याचे दिसत आहे. या अवैध धंद्यावर सातत्याने कार्यवाही होत असल्याने अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.



आष्टी : कासारी मुर्शदपुर चे माजी सरपंच संतोष भैया चव्हाण यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना आर्य प्रभात ग्रुप.



यशोदीप कंट्रक्शनचे मालक बाळासाहेब भुकण शिक्षण महर्षी माजी आमदार भीमराव धोंडे यांची वाढदिवसानिमित्त सत्कार करताना भारतीय जनता पार्टीची ज्येष्ठ नेते बाळासाहेब भुकण.



आष्टी शहरातील सोन्या–चांदीचे व्यापारी संतोष शेठ मेहेर यांचे वाढदिवसानिमित्त सत्कार करताना माजी आमदार साहेबराव दरेकर सुप्रभात ग्रुपचे नामदेव राऊत पोपट घुले , चेअरमन बाळासाहेब शिंदे ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, सेवानिवृत्त बीडीओ बबनराव खंडागळे सेवानिवृत्त शिक्षक रासकर सर, ऍड विधाते झांजे मामा, पारखे, गायकवाड, पत्रकार शरद रेडेकर ..



आष्टी : दैनिक राज्य लोकतंत्र्याच्या वाढदिवसानिमित्त अंकाचे विमोचन करताना माजी आमदार भीमराव धोंडे सोबत आष्टी प्रतिनिधी शरद रेडेकर

## दुग्ध व्यवसाय व शेळीपालनास चालना देण्यासाठी बीडमध्ये विशेष प्रशिक्षण

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी व युवकांना स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टिकोनातून दुग्ध व्यवसाय व शेळीपालन व्यवस्थापनावर एक विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील हॉटेल अतिथी, शिवाजी महाराज चौक येथे ०७ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

सदर प्रशिक्षणामध्ये दुग्ध व्यवसायातील संधी, शेळीपालनाचे आधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्ये तसेच व्यवसायात येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय यावर सखोल मार्गदर्शन शेळी तज्ञ डॉक्टर वसंतराव मुंडे धाराशिव यांच्याकडून केले जाणार आहे. चहापान, नाश्ता व भोजनासह फक्त ७५० रुपये शुल्क आकारण्यात आले असून, प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्यांना व्यावसायिक ज्ञानासोबतच मार्गदर्शनाचे व्यासपीठही मिळणार आहे. डॉ. वसंत मुंडे (मो. ९४२२५६५३६५) व श्री. एम आर सूर्यवंशी (मो. ९३२२७९९४००) यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण होणार असून, इच्छुकांनी वेळेत नोंदणी करून सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.ग्रामीण युवक व महिला उद्योजकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे हे प्रशिक्षण सत्र एक सकारात्मक पाऊल ठरणार असून, शेतीपूरक व्यवसायास चालना देणारा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे.



महेश आयुर्वेद कॉलेजच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी भीमराव धोंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद भेटला असून ५५ रक्तदात्यांनी आपले स्वागत आहे यावेळी युवा नेते भीमरावजी धोंडे साहेब यांचे चिरंजीव अभय राजे आपल्या वडिलांच्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा रक्तदान करून रक्तदात्यांचा उत्साह वाढवला यावेळी जेष्ठ पत्रकार उत्तमरावजी बोडखे महेश कॉलेजचे प्राचार्य चंद्रकांत गोसावी अशोक देवा जोशी आदी. छाया शरद रेडेकर




## आयपीएस ऋषिकेश शिंदे यांनी अंबाजोगाई उपविभागाचा पदभार स्वीकारला



**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या ९ जुलै च्या आदेशानुसार आयपीएस ऋषिकेश शिंदे यांचा परिवीक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्याने त्यांना अंबाजोगाई उपविभागाच्या सहाय्यक पोलिस अधीक्षक पदी पदस्थापना देण्यात आली आहे. त्यांनी ४ ऑगस्ट रोजी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला.**

अंबाजोगाई उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांची धाराशिव जिल्ह्यातील भूम उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून बदली झाली आहे. त्यानुसार ऋषिकेश शिंदे यांनी अनिल चोरमले यांच्याकडून सहाय्यक पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला. आपण या पदाला अधिक सक्षम करून कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कायम तत्पर राहू. नागरिकांना जास्तीत जास्त संरक्षण देण्याचा प्रयत्न करू आणि आपल्या अधिकाराचा वापर निपक्षपातीपणे करू अशी ग्वाही ऋषिकेश शिंदे यांनी यावेळी दिली.

## अतिक्रमण धारकास पीटीआर वाटपात भेदभाव करु नका –बाळराजे पवार



गेवराई । प्रतिनिधी

पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी महाराष्ट्र सरकारने २०१८ ला शासननिर्णय केला होता त्या नंतर गेवराईचे मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी तात्काळ शासन निर्णयाची अंमलबजावणी करुन संजयनगर साठेनगर येथील अतिक्रमण धारकास १५ ऑगस्ट २०२१ रोजी पि.टी.आर वाटप करण्यात आले होते त्यावेळेस संजयनगर येथील शासकीय जागेवरील आरक्षण असलेल्या अतिक्रमण धारकास सोडुन संजयनगर येथील २०७ अतिक्रमण धारकास तर साठेनगर येथील २२५ अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्यात आला होता व शासकीय जागेवरील आरक्षण उठवण्यासाठी त्यांनी प्रस्ताव पाठवाला होता त्या डि.पी. प्लॅनला २०२४ ला मंजुरी मिळाल्यानंतर संजयनगर येथील काही आरक्षण उठवण्यात आले होते म्हणून गेवराई नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी एप्रिल महिन्यात एक जाहीर प्रगटण काढुन अतिक्रमण धारकास पि.टी.आर साठी अर्ज दाखल करण्यास सांगितले होते त्या अनुषंगाने संजयनगर येथील काही अतिक्रमण धारकास पि.टी.आर.ची प्रकिया सुरु आहे त्या संदर्भात माहीती घेऊन अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटपात भेदभाव करु नका अशा










This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पिंपरी चिंचवड शहर वतीने महामोर्चा: प्रारूप विकास आराखड्याविरोधात गुरूवारी एल्गार!

पिंपरी । प्रतिनिधी

**विकास नियोजन विशेष घटक पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपसंचालक (नगररचना) व मा.आयुक्त,प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्याला दिशा देणारा प्रारूप सुधारित विकास आराखडा २०२५ हा केवळ कागदावरचा देखावा असून तो शहरातील जनतेच्या भावना, कायदेशीर बाबी आणि विकासाच्या वास्तवाशी पूर्णपणे विसंगत आहे. तब्बल ५०,००० नागरिकांनी हरकती घेतल्या ही त्याची पावती आहे. भूमिपुत्र, शेतकरी, छोटे कारखानदार, गोरगरिब सामान्य नागरिकांच्या अपेक्षा आणि गरजा पूर्ण करण्यास हा आराखडा सपशेल अपयशी ठरल्याचा हा पुरावा आहे. या आराखड्यातील गंभीर त्रुटी, अनियमतता आणि जनविरोधी धोरणांविरोधात आवाज उठविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर वतीने गुरूवार, दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी महापालिका भवनावर महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.**



गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांना बगल देत, हा आराखडा केवळ जुन्या चुकांची पुनरावृत्ती करत आहे. हा प्रारूप आराखडा केवळ बेकायदेशीरच नाही, तर पारदर्शकतेचा अभाव, आर्थिक अव्यवहार्यता आणि समन्वयाच्या अभावाचे उत्तम उदाहरण आहे. जुन्या आराखड्यातील ८०० हून अधिक आरक्षणे (एकूण १,४३० पैकी ५६%) कोणतीही फेरबदल न करता तशीच ठेवण्यात आली आहेत. विशेषतः, फक्त २०.८% आरक्षित जागांचा विकास झाला असून, १,१०० हून अधिक जागा अविकसित राहिल्या किंवा त्यावर अनधिकृत बांधकामे झाली आहेत. यामुळे आराखड्याची व्यवहार्यता धोक्यात आली असून, सार्वजनिक सुविधा केवळ कागदावरच राहिल्या आहेत. कालबाह्य आरक्षणांमुळे कायदेशीर वाद आणि महापालिकेचा आर्थिक भारसुध्दा वाढला आहे.

'भीमसृष्टी मैदान'वरील धक्कादायक आरक्षणे:

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील ऐतिहासिक 'भीमसृष्टी मैदान'वर पोलीस स्टेशन, मनपा उपयोग आणि बस टर्मिनसचे आरक्षण प्रस्तावित करणे हा आंबेडकरी अनुयायी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या भावनांवर केलेला क्रूर हल्ला आहे. हे मैदान आंबेडकरी चळवळीची आणि पिंपरी-चिंचवडच्या सामाजिक एकोप्याची जिवंत साक्ष आहे, जिथे हजारो नागरिक डॉ. आंबेडकर जयंतीसह वर्षभरात अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी एकत्र येतात. या मैदानाचे महत्त्व दुर्लक्षित करून, त्यावर आरक्षण टाकणे निषेधार्ह आहे. तसेच चिंचवड गावातील ऐतिहासिक चाफेकर स्मारकासाठी असलेल्या आरक्षणावर इतर आरक्षणे टाकले आहे. अशा चुकीच्या आरक्षणामुळे नागरिकांच्या भावनांचा व समाजाचा खेळ झाला आहे.

रेडझोन आणि पूररेषेत आरक्षणे -

देहू दारूगोळा कोठाराच्या २००० यार्ड प्रतिबंधित क्षेत्रात, पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या निळ्या आणि लाल पूररेषांमधील नाविकास क्षेत्रात तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांच्या १०० मीटर बफर झोनमध्ये बांधकामाला प्रतिबंध असतानाही, येथे शाळा, रुग्णालये, हॉकर्स झोन यांसारखी बांधकामयोग्य आरक्षणे प्रस्तावित केली आहेत.

**पूररेषेचा घोटाळा -**

सुधारित विकास आराखड्यात पूररेषांची आखणीमध्ये हेतुपुरस्सर बदल करण्यात आले आहेत. यामुळे काही जमिनी नाविकास क्षेत्रातून बाहेर पडल्या, तर काही विकसनशील जमिनी अकारण नाविकास क्षेत्रात समाविष्ट झाल्या, ज्यामुळे विशिष्ट जमीन मालकांना फायदा होत असून इतरांना नुकसान सोसावे लागत आहे.

HCMTR ३५ वर्षे कागदावरच -

३० मीटर रुंद आणि ३० किमी लांबीचा हाय कपॅसिटी मास ट्रान्झिट रोड (ऌउचढ) चा प्रस्ताव गेली ३५ वर्षे केवळ कागदावरच आहे. मोठ्या प्रमाणात पक्क्या बांधकामांमुळे त्याची अंमलबजावणी झालेली नाही. पर्यायी मार्गांचा विचार न करता, केवळ 'कॉपी पेस्ट' धोरण अवलंबल्याने बाधित होणाऱ्या नागरिकांचे हाल कायम आहेत.

**पिंपरी कॅम्प गावठाण मागणीकडे दुर्लक्ष**

पिंपरी कॅम्प हा मूळतः निर्वासितांच्या छावणीचा १०-१२ फूट रुंद आणि ४०-५० फूट लांब असलेल्या जमिनींवर दाट लोकवस्तीने विकसित झालेला परिसर आहे. या भागाला 'कँजस्टीड एरिया' म्हणजेच 'गर्दी' 'गावठाण' क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दीर्घकाळापासूनची मागणी आणि महानगरपालिकेतील ठरावही दुर्लक्षित करण्यात आला आहे. यामुळे या परिसराच्या ऐतिहासिक आणि सामाजिक संरचनेचे जतन होण्यास अडथळा निर्माण झाला आहे.

**एकिकडे घरांवरची आरक्षण वगळले, दुसरीकडे टाकले -**

आराखड्यात अनेक ठिकाणी आरक्षणांचे 'हब' प्रस्तावित केले आहे, जे शहर नियोजनाच्या दृष्टीने कुचकामी आहे. ५००-७०० मी. च्या अंतरावर एकाच प्रयोजनाची अनेक आरक्षणे (उदा. चऱ्होलीत १३ दवाखाने) प्रस्तावित केली आहेत. विशेष म्हणजे, पूर्वीच्या आराखड्यातील २२५ आरक्षणे पक्क्या घरांमुळे वगळली असताना, आता नव्याने अस्तित्वातील घरांवर आरक्षणे प्रस्तावित केली आहेत. हा धोरणातील विरोधाभास अंमलबजावणीमध्ये मोठे अडथळे निर्माण करेल.

**अधिकृत बांधकामेही धोक्यात -**

अनेक अधिकृत बांधकाम परवानगी असलेल्या इमारती आणि मंजूर खाजगी ले-आउट्सवर नव्याने आरक्षणे/रस्ते रुंदीकरण प्रस्तावित केल्याने शेकडो वैध बांधकामे धोक्यात आली आहेत. प्राधिकरणाच्या सेक्टर २१ मधील वैधरीत्या विकसित केलेल्या मिळकती आणि सेक्टर २२ मधील जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत गोरगरीबांसाठी बांधलेले पुनर्वसन प्रकल्प हे देहूरोड दारुगोळा कोठाराच्या प्रतिबंधित क्षेत्रात (रेड झोन) समाविष्ट झाल्याने तेथील मालमत्तांवर पुनर्बांधणी, सुधारणा, हस्तांतरणास मर्यादा आल्या आहेत आणि त्यांचे बाजारमूल्य घसरले आहे.

सुधारित विकास आराखड्यात महिला, किशोरवयीन मुली, अपंग व्यक्ती आणि वृद्धांसाठी सार्वजनिक शौचालये आणि युरीनल्ससाठी कोणतीही तरतूद नाही. ही मूलभूत चूक सार्वजनिक आरोग्य, लिंग समानता आणि स्वच्छतेच्या राष्ट्रीय व जागतिक आदेशांचे गंभीरपणे दुर्लक्षित करते.

अनेक कायद्यांचे उल्लंघन -

प्रारूप सुधारित विकास आराखडा २०२५ हा पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाची दिशा ठरवण्याऐवजी, शहराच्या समस्यांमध्ये भर घालत आहे. अनेक वैधानिक नियम आणि कायदेशीर आदेशांचे उल्लंघन करत तयार केलेला हा आराखडा पूर्णपणे बेकायदेशीर ठरतो. पारदर्शकतेचा अभाव, आर्थिक अव्यवहार्यता, कुचकामी नियोजन, समन्वयाचा अभाव, पक्षपातीपणा, अपूर्ण माहिती, डोंगर क्षेत्र परस्परपणे निवासी करणे, पूररेषेच्या आखणीत हेराफेरी, वॉटर बॉडीज व नाले गायब करणे, महानगरपालिकेच्या आर्थिक हिताविरुद्ध औद्योगिक क्षेत्राचे निवासीकरण, अनावश्यक आरक्षणे आणि अस्तित्वातील बांधकामांवर आरक्षणे टाकणे यासारख्या अनेक बेकायदेशीर बाबींमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर हा प्रारूप सुधारित विकास आराखडा तातडीने रद्द करण्याची मागणी करत आहे.या जनविरोधी आराखड्याविरोधात नागरिकांनी मोठ्या संख्येने महामोर्चात सहभागी होऊन आपल्या हक्कांसाठी आणि शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवाज उठवावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर वतीने करण्यात येत आहे. मोर्चा शगुन चौक, पिंपरी येथून पुणे-मुंबई महामार्गाने महापालिका भवनावर धडकणार आहे. मोर्चा गुरुवार दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी स. १०.३० वा शगुन चौक, पिंपरी येथून पुणे-मुंबई महामार्गाने महापालिका भवनावर धडकणार आहे.सदर पत्रकार परिषदेस शहराध्यक्ष योगेश बहल, मा.नगरसेवक अजित गव्हाणे, मा.विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, राहुल भोसले, मयूर कलाटे, कार्याध्यक्ष शाम लांडे, फजल शेख, पंकज भालेकर,प्रभाकर वाघेरे, माजी नगरसेविका माया बारणे, प्रकाश सोमवंशी, सतीश दरेकर,जगन्नाथ साबळे, मायाला खत्री,संजय उदावंत, रवींद्र ओव्हाळ, अक्षय माच्छरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पुणे रेव्ह पार्टी प्रकरणात नवा ट्विस्ट; प्रांजल खेवलकरांच्या तपासाचा अहवाल रुपाली चाकणकरांकडे जाणार

पुणे । प्रतिनिधी




शहरातील एका फ्लॅटवर झालेल्या पार्टीप्रकरणात माजी मंत्री आणि आमदार एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवळकर अडकले असून त्यांच्यासह साथीदारांना पुणे (झींपश) पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी, अद्याप न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने एकनाथ खडसेंनी (एझपरींह झहरवीश) अधिक बोलणे टाळले आहे. तर, रोहिणी खडसे यांनी शनिवारी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांची भेट घेतली. प्रांजल खेवलकर पोलिसांच्या ताब्यात असल्यामुळे शरद पवार आणि रोहिणी खडसे यांच्यात रेव्ह पार्टी संबंधित चर्चा झाली असणार आहे. याप्रकरणी, आता आणखी नवा ट्विस्ट आला आहे. कारण, राज्य महिला आयोगाने पोलीस आयुक्तांना पत्र लिहून एका बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेनं पुण्यातील रेव्ह पार्टीसंदर्भाने तक्रार केली असून त्याच्या तपासाचा अहवाल मागवला आहे.

पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रांजल खेवलकर यांच्या विरोधात बीडमधील एका संस्थेने राज्य महिला आयोगाकडे तक्रार केलीय. प्रज्ञा खोसरे यांच्या सानवी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेकडून ही तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीत प्रांजल खेवलकर यांनी खराडी भागातील ते हॉटेल २८ वेळा बुक करण्यात आल्याचा दावा करण्यात आलाय. खेवलकर यांनी या हॉटेलमध्ये अनेकवेळा मुलींना बोलावल्याचा आरोप देखील करण्यात आला असून हा मानवी तस्करीचा प्रकार असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. २८ वेळा रुम बुक करणे हा संगठीत रॅकेटचा भाग असू शकतो, असा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे. त्यासंदर्भाने राज्य महिला आयोगाकडे या प्रकरणाच्या चौकशीची मागणी करण्यात आली होती. आता, महिला आयोगाने या अर्जानंतर पुणे पोलीस करत असलेल्या चौकशीचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे, सोशल मीडियात आणि राजकारणात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करणाऱ्या रुपाली चाकणकर आणि रोहिणी खडसे पुन्हा एकदा आमने सामने आल्या आहेत. कारण, रोहिणी खडसे यांचे पती आरोपी असलेल्या या खटल्याच्या तपासाचा अहवाल महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणून रुपाली चाकणकर यांच्याकडे पाठवला जाईल. दरम्यान, प्रांजल खेवलकर यांना त्यांच्या चार मित्र आणि दोन महिलांसह शनिवारी पहाटे खरडीत पार्टी करताना अटक करण्यात आली होती. या पार्टीत अंमली पदार्थ सापडल्याचा पोलिसांचा आरोप आहे. त्यानुसार, त्यांच्यावर खटला दाखल असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

पिंपरी । प्रतिनिधी



पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पिंपरी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संरक्षित क्षेत्रातील मालमत्तांना सामान्य करातील सवलत देणे, वैद्यकीय विभागासाठी इंटेन्सव्हिस्ट संवर्गातील पदे ११ महिन्याच्या कालावधी करिता कंत्राटी पद्धतीने भरणे, महापालिका रुग्णालयात कार्डीयाक डोल्पर / २ डी युको व थेडमिल टेस्ट सेवा उपलब्ध करून देणे, प्रभाग र मधील जलनि:सारण नलिकांच्या वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोक अप काढणे कामास मुदतवाढ देणे, धर्मवीर संभाजी महाराज पुतळा परिसरात शंभू सृष्टी उभारणे व अनुषांगिक कामे करणे, कॉन्फेरन्स ट्रेनिंग अर्बन सस्टेनेबल मोबिलिटी नियोजन करणे, डूडूळगाव येथे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिक दुर्लभ घटकांसाठी निवासी गाळे बांधणे व प्रकल्पातील सदनिकांच्या किचन खिडकी, बाल्कनी पेसेज व ओएचडब्युटी वेस्टर्न कमोड बसविणे, २०७ बालवाड्यांमधील विद्यार्थ्यांना सकस आहार पुरवठा करण्यासाठी अन्नामृत फाउंडेशन यांना २ महिन्याची मुदत वाढ देणे, उद्यान व क्रीडा विभागाकडील २०२५-२६ च्या मूळ अंदाज पत्रकात कामांच्या नावांचा समावेश अकारेण तरतूद, वाढ व घट मान्यता घेणे शिफारस करणे, क्रीडा विभागाकडील २०२५-२६ च्या मूळ अंदाज पत्रकामधील तरतुदीमध्ये घट/ वाढ करणे, पिंपरी चौक येथे माता रमाई पुतळा उभारणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी वास्तुविशारद यांची नेमणूक करणे, मनपा कार्यक्षेत्रात नव्याने विकसित करण्यात आलेले रस्ते दुभाजक व आवश्यक ठिकाणी पोयता माती पसरविणे,निविदेतील शिल्लक कालावधी करिता वाढीव खर्चास मान्यता देणे, अ क्षेत्रीय कार्यलयांतर्गत उद्याने देखभाल करणे, प्रभाग २१ मधील रुग्णालय इमारती मधील स्थापत्य विषयक दुरुस्ती कामे करणे, क्रीडा संकुल येथे उभारलेल्या सी सी टीव्ही यंत्रणेची वार्षिक तत्वावर दुरुस्ती देखभाल करणे, अग्निशमन व माध्यमिक विभागाकरिता अनुक्रमाने ५ व १३ डेटा एन्ट्री ऑपरेटर नियुक्ती करणे, तालेरा रुग्णालयातील विविध कामाकरिता हाय व्हॅक्युम सेक्शन मशीन खरेदी करणे, अ गटातील वाहनाचे दुरुस्तीकरिता एजन्सीची नेमणूक करणे, भामा आसखेड पाणीपुरवठा जलवाहिनी योजनेला अडथला ठरणारे उच्च दाब पॉल हलविणे, कला खडक व ड क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येथील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे विद्युत विषयक कामकाज करण्याच्या सुधारित खर्चास मान्यता देणे, मुख्याध्यापक शिक्षण संवाद सत्र कार्यक्रमासाठी भोजन व्यवस्थेच्या खर्चास मान्यता देणे, माध्यमिक विद्यालयातील विविध परीक्षेकामी प्रश्न पत्रिका, उत्तर पत्रिका व आवश्यक स्टेशनरी साहित्य छपाई कामास मान्यता देणे, माध्यमिक विभागाकडील १० वि विद्यार्थ्यांना जागृती बचत गट व गुरु कृपा महिला बचत गटामार्फत शालेय पिशवी (लरस ) खरेदीच्या खर्चास मान्यता देणे, २०२४-२५ च्या आर्थिक विवारणास मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# विमाननगर परिसरात 'भाईचा बड्डे'; पोलिस यंत्रणेचे वाजले बारा

पुणे । प्रतिनिधी



पुणे शहराच्या वाढत्या गुन्हेगारीवर भाष्य करणारा एक चित्रपट काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झाला होता. त्यात 'भाईचा बड्डे वाजले बारा' हे गाणं आणि गुन्हेगारी विश्वातील वाढदिवसांचे दृष्य विशेष गाजले होते. वास्तविक आयुष्यातही अशाच धाटणीची एक घटना शनिवारी मध्यरात्री पुण्यातील विमाननगर परिसरात घडली. दरम्यान याप्रकरणी टीकेची झोड उठल्यानंतर विमाननगर पोलिसांनी बारा जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी पोलीस कर्मचारी हरिप्रसाद पुंडे यांनी दिलेल्या तक्रारीनूसार आकाश कंचिले, निखील कांबळे, फिरोज शेख, सोहेल कनुल, अखलाख शेख, वनराज जाधव, टक्या मिरे, राहुल घाडेग, साहिल कांबळे, आतिफ शेख तसेच इमारतीचे सिक्युरिटी मॅनेजर विजय अंबुरे आणि ईश्वर भोंडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विमाननगरमधील दत्त मंदिर चौकात असलेल्या स्कायमॅम्स इमारतीतील एका पबच्या पार्किंगमध्ये शंभरहून अधिक तरुणांनी मध्यरात्री मोठ्या थाटात एका 'भाई'चा वाढदिवस साजरा केला. ही पार्टी फक्त एक साधा वाढदिवस नव्हता, तर पुण्यातील गुन्हेगारी विश्वातील अनेक चर्चित चेहऱ्यांची उपस्थिती होती. यामुळे ती पोलीस यंत्रणेच्याही दृष्टीने धोक्याची घंटा ठरली आहे. पार्टीचं आयोजन विमानतळ पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार फिरोज शेख याने केलं होतं. त्याच्यावर सरकारी कर्मचाऱ्याच्या कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल आहे.

विशेष म्हणजे याच परिसरात त्याने यापूर्वी पोलिसांशी अरेरावी देखील केली होती. या पार्टीमध्ये ' मोक्का' अंतर्गत नुकताच कारावासातून मुक्त झालेला आकाश कंचिले आणि त्याची टोळीही हजर होती. वाढदिवसाचा मुख्य 'हीरो' होता निखिल कांबळे टोळीचा म्होरक्या, ज्याच्यावर येरवडा पोलीस ठाण्यात पोलीस कोठडीतून पळून जाण्याचा गंभीर गुन्हा दाखल आहे. काही दिवसांपूर्वीच तो येरवडा कारागृहातून सुटून बाहेर आला आहे. यातील गुन्हा दाखल असलेल्या दहा आरोपींनी दहशत माजविण्याच्या दृष्टीने जमा करुन. हातात लाठ्या, काठ्या आणि धारदार शस्त्रे जवळ बाळगल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक शिंदे तपास करत आहेत.

# अल्पसंख्याक महिला व युवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू


पुणे । प्रतिनिधी

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील महिला व युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याकरिता कौशल्य विकासाचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. याअंतर्गत प्रतिजिल्हा ६४० प्रमाणे एकूण २३ हजार ४० उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत.अल्पसंख्याकच्या मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख, पारशी, जैन व ज्यू या विविध समुदायातील होतकरू महिला व युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता १५ ते ४५ वयोगटातील महिला व युवकांकरिता कौशल्य विषयक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. कौशल्य विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी नियोजन करून त्याची अंमलबजावणी केली जात आहे.

प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरिता एका अभ्यासक्रमाची सरासरी २५ हजार रुपये याप्रमाणे अंदाजित ५७ कोटी ६० लाख रुपये प्रशिक्षण शुल्क गृहीत धरण्यात आले आहे. उमेदवारांना प्रशिक्षण देण्याकरिता सात प्रशिक्षण संस्थांची निवडही करण्यात आलेली आहे. याकरिता स्वतंत्र वेब पोर्टल उपलब्ध करून दिलेले आहे. अल्पसंख्याक विकास विभागाच्या वतीने कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेंतर्गत १०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित केलेला आहे. त्यातील १७ कोटी ३८ लाख रुपयांच्या निधीचा पहिला हप्ता संस्थांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

# प्रदर्शित होण्यापूर्वीच 'खालिद का शिवाजी' चित्रपट वादाच्या भोवऱ्यात; पुण्यात हिंदू महासंघाकडून बंदीची मागणी कारण

पुणे । प्रतिनिधी




नुकताच 'खालिद का शिवाजी' या चित्रपटाचा ट्रेलर यूट्यूबवर प्रदर्शित करण्यात आला आहे. मात्र, प्रदर्शनापूर्वीच चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली जात आहे. या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात काही वादग्रस्त मांडणी केल्याचा आरोप हिंदू महासंघाने केला आहे.

त्यामुळे हा चित्रपट महाराष्ट्रात प्रदर्शित करू नये, अशी भूमिका हिंदू महासंघाकडून घेण्यात आली आहे. हिंदू महासंघाने तात्काळ चित्रपटावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी केली आहे. तसे पत्र सेन्सॉर बोर्ड, या चित्रपटाच्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांना पाठविण्यात आले आहे, जर हा चित्रपट प्रदर्शित केला तर थेट आंदोलनाचा इशाराही हिंदू महासंघाकडून देण्यात आला आहे.


हा चित्रपट ८ ऑगस्ट या दिवशी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची फिल्म फेस्टिव्हलसाठी निवड झाल्याचे निर्मात्यांनी जाहीर केले आहे. मात्र, हिंदू संघटनाचा चित्रपटावर बंदी घालण्यात यावी, यासाठी आक्रोश करण्यात येत आहे. या चित्रपटात शिवाजी महाराजांचा खोटा इतिहास मांडला गेला असून, त्यांचे विकृतीकरण करण्यात आले आहे, असा आरोप हिंदू महासंघाचे अनंद दवे यांनी केला आहे.

दरम्यान, खालिद का शिवाजी हा चित्रपट रिलीज होण्याअगोदर वादाच्या भोवऱ्यात सापडला असून, जर कोणी हा चित्रपट थिएटरमध्ये लावला तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. मात्र, अद्यापर्यंत याप्रकरणी चित्रपटाचे निर्मात्यांनी अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. यामुळे या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत कोणता निर्णय चित्रपटाचे निर्माते घेतात हे पाहावे लागणार आहे.

# पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल २०२४-२५ चे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते प्रकाशन

पिंपरी । प्रतिनिधी

**पिंपरी चिंचवड शहराच्या पर्यावरण क्षेत्रातील स्थितीचा सखोल मागोवा घेणारा पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल सन २०२४-२५ चे आज पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते स्थायी समितीच्या बैठकीत प्रकाशन करण्यात आले.**




या अहवालात मागील तीन वर्षांचा तुलनात्मक आढावा घेत शहरातील पर्यावरणविषयक स्थितीचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. क्षेत्र आणि लोकसंख्या, हवामानातील बदल, पर्जन्यमान, पाणीपुरवठा, नदी-नाले-तलावांची सद्यस्थिती, जलनि:स्सारण योजना व मैलाशुद्धीकरण प्रकल्प, हवेतील व ध्वनी प्रदूषणाचे स्तर, मृदा गुणवत्ता, घनकचरा व्यवस्थापन, ऊर्जा वापर, रस्ते आणि वाहतूक व्यवस्था, स्मार्ट सिटी प्रकल्प, शिक्षण, वैद्यकीय सेवा, उद्याने, उद्योगधंदे, आपत्ती व्यवस्थापन, शहर नुतनीकरण योजना आदी घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, पिंपरी चिंचवड शहराने जलनि:स्सारण व्यवस्थापनाच्या बाबतीत १०० टक्के निकष पूर्ण करत सलग दुसऱ्यांदा 'वॉटर प्लस' मानांकन प्राप्त केले आहे. यामध्ये घरपातळीवरील घनकचरा व्यवस्थापनातून सुक्या कचऱ्यापासून उभारलेला वेस्ट टू एनर्जी प्रकल्प, राडारोड्यावर प्रक्रिया करणारा सी अँड डी प्लांट, एमआरएफ युनिट्स, ओला-सुका कचरा ट्रान्स्फर स्टेशन, मोशीतील बायो मेडिकल वेस्ट प्लांट, कंपोस्टिंग युनिट्स, पुनर्वापर प्रकल्प, बायोगॅस युनिट्स आणि विकेंद्रित प्रक्रिया केंद्रे यांचे विशेष योगदान राहिले आहे. या सर्व कार्यवाहीमुळे शहराने सात-स्टार गार्बेज फ्री सिटीचे मानांकनही यशस्वीरित्या राखले आहे. मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या या अहवालासाठी कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बन्सल, कार्यकारी अभियंता सोहन निकम, चीफ केमिस्ट उमा भोगे, कनिष्ठ अभियंता प्रतीक सूर्यवंशी आणि पर्यावरण विभागातील इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पुणे महापालिकेडून गणेशउत्सवासाठी नियमावली जाहीर; मंडळांसाठी काय आहेत नियम

पुणे । प्रतिनिधी




अवघे काही दिवस गणरायाच्या आगमनाला राहिले आहेत. यामुळे सार्वजिक गणेशउत्सव मंडळाची लगभग पाहायला मिळत आहे. पुणे शहरात आणि जिल्ह्यात गणपती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशउत्सवाला दिवस कमी राहिल्याने महापालिकेकडून आगामी गणेशउत्सव आणि नवरात्रउत्सवासाठी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेने आखून दिलेल्या नियमानुसार मंडळांना महापालिकेची परवानगी घ्यावी लागणार आहे.

असे आहेत नियम?

मंडपाची उंची ४० फुटांपेक्षा जास्त नसावी. त्याहून अधिक उंच मंडपास 'स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी' बंधनकारक असणार आहे.

मंडप व स्वागत कमानी उभारताना आपत्कालीन सेवा वाहनांसाठी रस्ते मोकळे ठेवणे बंधनकारक असेल.

कमानींची उंची रस्त्याच्या पृष्ठभागापासून १८ फुटांपेक्षा जास्त राहील, याची दक्षता घ्यावी.

आवश्यकतेनुसार स्वयंसेवक किंवा सुरक्षारक्षक नेमावेत.

पर्यावरण व ध्वनिप्रदूषणासंदर्भातील सर्व नियम पाळणे बंधनकारक असणार आहेत.

अत्यंत महत्वाचे

२०१९ मध्ये दिलेल्या उत्सव मंडप, स्वागत कमानी आणि रनिंग मंडप इत्यादीच्या परवानग्या ग्राह्य धरण्यात येतील. त्यामुळे परवानाधारकांना नव्याने परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. शहरातील ज्या मंडळांना नव्याने गणेशोत्सव साजरा करायचा असेल किंवा २०१९ मधील परवानगीची जागा प्रकल्प बाधित झाल्याने बदल करायचा असल्यास त्यांना २०१९ नुसारच परवानगी मिळणार असल्याचेही पालिकेने नमूद केले आहे. संबंधित उत्सव संपल्यानंतर मंडळांनी तीन दिवसांच्या आत स्वखर्चाने मंडप, रनिंग मंडप, देखावे, विटांचे बांधकाम आणि अन्य साहित्य हटवावे, असे पालिकेने सांगितले आहे.

आग्रही मागणी

पुणे शहरातील मानाच्या पाच गणपतींची विसर्जन मिरवणूक निघाल्यानंतर इतर सार्वजनिक मंडळे मार्गस्थ होतात. यामुळे विसर्जन मिरवणुका वेळेत पूर्व होत नाहीत. या पार्श्वभूमीवर लक्ष्मी रस्त्यासह सर्व मार्गावरील गणपती विसर्जन मिरवणूक सकाळी ७.३० वाजता सुरू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी जोर धरू लागली आहे.